प्रकरण दोन

# मोहन पाटील यांच्या लघुकादंबऱ्यांतील आशयसूत्रे

## प्रकरण दोन

# मोहन पाटील यांच्या लघुकादंबऱ्यांतील आशयसूत्रे

मानवी जीवनातील सुख-दु:खाचे शब्दरूप प्रकटीकरण म्हणजेच साहित्य, मानवी मनाचा तळ शोधण्याचा प्रयत्न प्रत्येक वाङ्मय प्रकारातून केला जातो. तसे लघुकादंबरीचा विषयही मानवी जीवनविषयक शोध आणि बोध आहे. त्यासाठीच तिचा लेखन प्रपंच मांडलेला असतो. लघुकादंबरीकार तो मांडत असतो. आपल्या अनुभवाने अनुलोम अशा अनुभवातून लघुकादंबरीकार आपले एक जाणीवेचे विश्व निर्माण करीत असतो. लघुकादंबरीकाराची साहित्यकृती ही त्याच्या बौद्धिक अधिकारापेक्षा त्याला आलेले अनुभव आणि त्याची व्युत्पन्तता, त्याची बहुश्रुतता, त्याचा व्यासंग, जीवनविषयक मूल्यांकडे पहायचा दृष्टिकोन यांनी आकाराला आलेली असते. प्रत्येक कादंबरीकाराभोवती त्याचे असे वास्तव, जीवन विश्व, भाव विश्व असते. पूर्वानुभव आणि मानव जीवन विश्व यांची सुरेल सांगड घालूनच तो मानवी मनाचे वेध घेऊन नवे विश्व निर्माण करीत असतो. हे भावविश्व ज्ञात-अज्ञात अनुभवाच्या पातळीवरचे असू शकते. परंतु त्यामध्ये ज्ञात अनुभवार्थाच्या तोडीचे विश्व निर्माण करण्याची ताकद असते. हे भावविश्व कल्पित स्वरूपाचे असले तरी वास्तविक जीवनविश्वाचा आभास नक्कीच निर्माण करू शकते. परंतु ते कादंबरीकाराच्या जाणीवेच्या पातळीवर, त्याच्या संवेदनशीलतेवर अधिकतर आधारीत असते. किंबहुना त्या लेखकाच्या साहित्याचा दर्जा, त्याचे वाङ्मयीन वजन आणि उपयोगिता ठरविण्यात वरील गोष्टी नक्कीच सहाय्यभूत ठरतात. लेखकाच्या अफाट अनुभव विश्वाला व्यापक सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, धार्मिक, संदर्भही असतात. ज्यातून त्याच्या अनुभवामध्ये विविधता साधली जाऊन लघुकादंबरीलाही वैशिष्ट्य प्राप्त होते.

लेखक का लिहितो? हा प्रश्न गंभीर असला तरी गौण ठरतो आणि लेखक काय आणि कसे लिहितो या गोष्टींनाच वलय प्राप्त होते. त्यामुळे लेखकाच्या साहित्याच्या प्रेरणा शोधण्यापेक्षा लेखकाने लिहिलेल्या साहित्यातील अनुभवार्थ आशय धुंडाळणे, त्या लेखकाला समजून घेण्याच्या दृष्टिकोनातून अधिक योग्य वाटते. याविषयी आनंद यादव

म्हणतात – 'मी का जगतो?' या प्रश्नाचे उत्तर देणे जितके कठीण आहे, तितकेच 'मी का लिहितो?' या प्रश्नाचे उत्तर देणे कठीण वाटते.''[१]

आनंद यादवांच्या मते लिहिणे ही क्रिया जगणे या मूलभूत प्रक्रियेसारखीच साहित्यिकांसाठी प्राथमिक क्रिया ठरते. किंबहुना लेखन हा साहित्यिकाच्या जगण्याचाच एक भाग होऊन जातो आणि जगण्यामागची एकच प्रेरणा जशी ठामपणे सांगता येत नाही तसेच लिहिण्यामागचीही एकच प्रेरणा ठामपणे सांगता येत नाही. परंतु 'का जगतो आहोत?' याचे उत्तर ठाम नसले तरी 'कसे जगतो आहोत?' या प्रश्नाचे नक्कीच उत्तर देता येऊ शकते. तसे 'लेखकाने का लिहिले?' यापेक्षा 'लेखकाने काय लिहिले?' हा मुद्दा महत्त्वपूर्ण ठरतो. ज्याचे उत्तर ठामपणे देता येऊ शकते. आणि या उत्तरावरच त्या लेखकाचा कला-आविष्कार, त्या लेखकाची व्युत्पन्तता, त्याच्या जाणिवांचा विकास आणि त्याची अनुभवार्थता यांचा सार आपल्या लक्षात येतो. यातच त्या लेखकाची साहित्य भरारी लक्षात येते.

कोणतेही साहित्य, कलावादी, रंजनवादी असले तरी वास्तवतेची छटा असल्याशिवाय ते साहित्य मनाला भिडत नाही. कारण साहित्याच्या प्रयोजनाचा विचार करता केवळ रंजन, कला या मूल्यांचा विचार करून साहित्याचा दर्जा ठरविणे योग्य होत नाही. कारण कलेसाठी जीवन नसून जीवनासाठी कला आहे. एकूणच मानवी जीवनात जीवनाला प्रथम स्थान आहे आणि इतर गोष्टी त्यानंतर येणाऱ्या आहेत. आणि जे साहित्य जीवनवादी साहित्य असते त्यात वास्तववाद नक्कीच असतो. किंबहुना वास्तवतेचे लेणं लेऊनच ती कलाकृती आकृतीबंध प्रकट करीत असते. लघुकादंबरीच्या बाबतीतही हेच सूत्र लागू पडते. लघुकादंबरीत वास्तवतेला अधिक महत्त्व असते. वास्तवदर्शन जर त्या लघुकादंबरीत नसेल तर गंध नसलेल्या फुलासारखी त्याची अवस्था होईल. वास्तवचित्रण जर उठावदार व्हायचे असेल तर आशयसूत्रेही तेवढ्याच उठावदार पद्धतीने गुंफली गेली पाहिजेत. ही आशयसूत्रे महत्त्वाची भूमिका वठवतात. लघुकादंबरीत जीव ओतताना जसे कलात्मकता आणतात तसेच वास्तव जीवनमूल्ये ही मांडतात. साहित्याची उंची गाठण्यास सहाय्यभूत ठरतात.

ही आशयसूत्रे लेखकाच्या जीवनविषयक दृष्टिकोनातून, अनुभवातून, लेखकाने केलेल्या मानवी जीवनाच्या सूक्ष्म निरीक्षणातून साकार होत असतात. लेखकाचा

जीवनाविष्कार, कलाविष्कार जेवढा अधिक तेवढी आशयसूत्रे उच्च, दर्जेदार आणि जेवढी आशयसूत्रे दर्जेदार तेवढी साहित्याला (लघुकादंबरीला) उंची अधिक. हे सूत्र लघुकादंबरीकाराने गणितातल्या सूत्रासारखे नेहमी लक्षात ठेवावे लागते. तरच तो लघुकादंबरीकार समाजमान्य लेखन करू शकतो.

लेखकाची जीवनदृष्टी, अनुभवार्थता, व्यत्पन्नता, बहुश्रुतता, संवेदनशीलता, आविष्करणशीलता या साऱ्यांतून लघुकादंबरीकार लघुकादंबरीत घटना, प्रसंग आणि व्यक्ती यांच्या परस्पर अतूट संबंधातून कथासूत्र गुंफत असतो. या कथासूत्रांच्या गुंफणीतून आशयांचा तरल बंध तयार होतो त्यालाच आशयसूत्र म्हणतात. लेखकाचा कलाविष्कार आशयसूत्रांना आकार देत असतो.

आशयसूत्रांच्या रचनेचा थेट संबंध लेखकाच्या साहित्यिक जडणघडणीशी येतो. लेखकाला अनुभवविश्व जेवढा अफाट तेवढाच आशयसूत्रही समृद्ध असतात. लघुकादंबरीला वास्तवता प्राप्त करून देण्यामध्ये आशयसूत्रांचे गुंफण खूप महत्त्वाचे ठरते.

कलाकृतीला उच्च ठरविण्यात, त्या कलाकृतीचे सर्वच घटक कार्यरत असतात. ‘घटना, प्रसंग, व्यक्ती, आयशसूत्रे, पण त्यातही अधिक महत्त्व प्राप्त होते ते घटना आणि आशयसूत्रांना. या दोन्हींचा विचार करता त्यातही घटनेपेक्षा आशयसूत्रे नक्कीच महत्त्वपूर्ण ठरतात. ही आशयसूत्रे वाचकाच्या मनाचा ठाव घेणारी असतात. लेखकाला कलाकृतीशी खिळवून ठेवणारी असतात. ही आशयसूत्रे कधी एककल्ली असू शकतात किंवा कधी कधी अनेक उपवलयाचे मिळून एक आशयसूत्र बनत असते. लेखकाचा जीवनानूभव म्हणजे एक अखंड शृंखला असते. जी लेखक साहित्याच्या रूपाने, आशयसूत्रांची एकेक कडी गुंफत व्यक्त करीत असतो. ही आशयसूत्रे एकमेकांत इतकी घट्ट असतात की एखादे आशयसूत्र अप्रस्तुत राहिले तर पूर्ण शृंखलाच तुटून जाते आणि वाचकाला लघुकादंबरीचा आस्वाद घेता येत नाही. लघुकादंबरीत प्रधान आशयसूत्रे असतात. तशी काही उपआशयसूत्रेही असतात. ग्रहांना जसे उपग्रह असतात. हे उपग्रह सूर्यमालेचा घटक असले तरी ग्रहांची कक्षा ओलांडीत नाहीत. तशी ही आशयसूत्रे असतात. ग्रह काय उपग्रह काय, सूर्याभोवती प्रदक्षिणा घालणे हा त्यांचा उपजत गुणधर्म तसे आशयसूत्रे. उपआशयसूत्रे, लघुकादंबरीच्या मुख्य

गाभ्याभोवती फिरत राहतात. यातूनच त्यांची भ्रमणकक्षा निर्माण होऊन लघुकादंबरीच्या कथानकाला गतिमानता प्राप्त होते.

मोहन पाटील हे स्वतंत्र भूमिका आणि जाणीव असणारे लेखक आहेत. साहित्याच्या चाकोरीतून न जाता स्वत:ची वेगळी वाट चोखाळणे हा मोहन पाटलांचा स्थायी भाव आहे. म्हणूनच त्यांच्या लिखाणातून व्यक्त होणाऱ्या जाणीवा इतर ग्रामीण साहित्यातून भिन्न असल्याचे जाणवते. लेखकाच्या साहित्याचा स्तर हा जसा त्याच्या अनुभवांवर आधारित असतो तसाच तो त्याचा जीवनविषयक दृष्टिकोनावरही अवलंबून असतो. लेखकाची जीवनदृष्टी जितकी व्यापक तितके त्याचे साहित्य समृद्ध. कादंबरी वाङ्मयातही लेखकाची हीच जीवनदृष्टी महत्त्वाची ठरते. याबाबत डॉ. बांदिवडेकर म्हणतात, 'जीवनदृष्टीच्या व्यापकतेवर, सखोलपणावर आणि मौलिकतेवर,लेखकाची महत्ता अवलंबून असते'.[२]

लेखकाची जीवनदृष्टी समृद्ध बनायची असेल तर त्याला मानवी जीवनाचे सूक्ष्म निरीक्षण करावे लागते. अनुभवांना अर्थ प्राप्त व्हावा लागतो. त्याच्या प्रचितीचे आणि अनुभवार्थांचे मिश्रण तयार व्हावे लागते. त्याची जीवनदृष्टी प्रतिकात्मकरूपाने व्यक्त व्हावी लागते. मोहन पाटील यांच्या साहित्यनिर्मितीची पार्श्वभूमीच खेडे. खेड्यातले व्यवहार असल्यामुळे साहजिकच ग्रामीण जीवनाविषयीची त्यांची जीवनदृष्टी समृद्ध बनत गेली. त्यांच्या लघुकादंबऱ्यांना साहित्यिक दर्जा प्राप्त झाला.

मोहन पाटील आपल्या लघुकादंबरीतून ग्रामीण जीवनाचे वास्तवदर्शी चित्रण वाचकांसमोर मांडतात. लेखक जे अनुभवतो तेच लिखाणांतून मांडतो. जसे मोहन पाटीलांनी जे अनुभवले त्यालाच शब्दबद्ध केले आहे. त्यांच्या लघुकादंबरीतील पात्रे, व्यक्तिरेखा त्यांनी जवळून पाहिल्या आहेत. अनुभवल्या आहेत. त्यामुळे त्या अधिक सजिवंत वाटतात. वाचकांच्या मनाचा ठाव घेतात. 'पाचुंदा' हा मोहन पाटलांच्या पाच लघुकादंबऱ्यांचा संग्रह. पाचही लघुकादंबऱ्यांचा विषय वेगळा असला, आशयसूत्रे थोड्याफार फरकाने भिन्न असली तरी ग्रामीण वास्तवाचे यथार्थ दर्शन हा एकच उद्देश या आशयसूत्रांचा दिसून येतो. त्यांच्या लेखनातून बदलते ग्रामीण जीवन, बदलता गावगाडा, गावगाडा विस्कळीत होणे, कथानायकाची अगतिकता, नियतीला शरण जाण्याची त्याची तयारी, बंडखोरी न करणे, ग्रामीण राजकारण, रक्तपिपासू वृत्ती, निसर्गाचा कोप, ग्रामीण परिसरातील दारिद्र्य,

रोजगाराच्या संधी नसणे यासारखी प्रमुख आशयसूत्रे असून काही उपआशयसूत्रेही आहेत. जसे ग्रामीण जीवनातील समस्या, यांत्रिकीकरणामुळे, औद्योगिकीकरणामुळे निर्माण झालेल्या समस्या, शेतकऱ्याचे दारिद्र्य, त्याचे दुभंगलेपण, निसर्गचित्रण, शेतीचे बदलते स्वरूप यासारखी उपआशयसूत्रे आढळतात.

मोहन पाटील यांच्या लघुकादंबरीच्या क्षेत्रातील स्थान निश्चितीस त्यांच्या लघुकादंबऱ्यातील आशयसूत्रे सहाय्यभूत ठरतात. त्यांच्या आशयसूत्राच्या आणि निवडीतून त्यांच्या मांडणीतून त्यांचा जीवनानुभव आविष्कृत होताना दिसतो. यातूनच त्यांचे वेगळेपण सिद्ध होते.

त्यांचे लेखन ग्रामीण, बदलत्या ग्रामीण जीवनाचे वेध घेणारे आहे. पारंपारिक, रुढ ग्रामीण जीवनाकडे न पाहता, बदलत्या ग्रामीण जीवनाचे बदलते वास्तव चित्रित करण्याचा ते प्रयत्न करतात. आणि याच बदलत्या ग्रामीण जीवनातून निर्माण होणाऱ्या समस्या, नातेसंबंधातले ताण-तणाव, राजकारण, अर्थकारण, अगतिकता, निसर्गाचा कोप, ग्रामीण परिसरात रोजगार उपलब्ध नसणे, यासारखी विविध आशयसूत्रे मोहन पाटील आपल्या लघुकादंबऱ्यांतून मांडलेली दिसतात. मोहन पाटील यांच्या लघुकादंबऱ्यांचे वेगळेपण आणि ग्रामीण वास्तवता लक्षात येण्यासाठी या आशयसूत्रांचा विचार करणे आवश्यक ठरते.

प्रस्तुत प्रकरणात मोहन पाटील यांच्या 'पाचुंदा' या पाच लघुकादंबरीतील आशयसूत्रांचा विचार करताना, ढोबळ पद्धतीने, अभ्यासाच्या सोयीसाठी आशयसूत्रांची प्राथमिक वर्गवारी केलेली आहे. त्यासाठी कोणत्याही काटेकोर निकषांची बंदिस्त मांडणी स्वीकारलेली नाही.

हे वर्गीकरण खालीलप्रमाणे करता येईल.

१. बदलते ग्रामीण जीवन.

२. ग्रामीण राजकारणाचे बदलते संदर्भ.

३. शेतकऱ्यांचे दारिद्र्य आणि शोषण.

४. घट्ट होत जाणारी जाती व्यवस्था.

५. स्त्री जीवन.

६. ग्रामीण माणसाची अगतिकता.

[illegible] SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

७. शेतीचे बदलते स्वरुप.

८. शेतीतील यांत्रिकीकरणातून निर्माण झालेल्या समस्या.

## १. बदलते ग्रामीण जीवन :

१९६०-६५ च्या नंतर ग्रामीण जीवनामध्ये बदल घडून येऊ लागले. या बदलाची अनेक कारणे अभ्यासकांनी मांडली. त्यापैकी महत्त्वाचं कारण म्हणजे शिक्षण. या कालापासून ग्रामीण भागात झपाट्याने शिक्षणाचा प्रसार होऊ लागला. 'गाव तिथे शाळा' ही संकल्पना दृढ झाली. तसेच शासकीय स्तरावर यशस्वी प्रयत्नही झाले. या शाळेत ग्रामीण भागातली विविध स्तरांवरील मुलं शिक्षण घेऊ लागली. शेतकऱ्यालाही आपली मुलं शिकली पाहिजेत, त्यांनी शहरात जावून नोकरी केली पाहिजे अशा जाणिवा निर्माण झाल्या. यातूनच शहराकडे तरुणांचा ओढा वाढला. शिक्षणासाठी आणि नंतर नोकरीच्या निमित्ताने हा तरुणवर्ग शहरात स्थायिक होऊ लागला. या तरुणांच्या संख्येत दिवसेंदिवस वाढच होत गेली.

पण मोठ्या प्रयासानं शिक्षण घेऊन त्यांच्या पदरात काय पडलं? हाडाची काडं आणि रक्ताचं पाणी करून शेतकऱ्यांनी मोठ्या हौसेनं आपल्या मुला-लेकरांना शिकवलं. पण त्यांना अखेर काय मिळालं?'

बहुसंख्य सुशिक्षित तरुणांच्या वाट्याला बेकारीच आली. अपेक्षाभंगाशिवाय पदरी काहीच पडलं नाही. 'लिगाड'मधील रघु मास्तर, 'बस्तान'मधील बसू. हे कथानायक याच समस्येचे बळी ठरले आहेत.

एकीकडे शिक्षण प्रसार झाला. खेडोपाडी शाळा झाल्या. जागृती झाली. पण त्याचबरोबर अनेक समस्या आ वासून उभ्या राहिल्या. तरुणांच्या नोकरीचा प्रश्न, शहरातलं विस्थापितांचं जगणं, खेड्याचं उद्ध्वस्त होणं, गावगाडा विस्कळीत होणं, यासारखे गंभीर परिणाम जाणवू लागले आहेत.

बदलत्या ग्रामीण जीवनाच्या कारणांची परंपरा तपासत असताना, शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण हेच कारण यांच्या मुळाशी असण्याची मते अनेक समीक्षकांनी नोंदवली आहेत. हे खेडे आहे, पण विचारांती असे लक्षात येते की, हे पुरेसे खेडे नाही कारण

शिक्षणाला एक स्वतंत्र मूल्य म्हणून पाश्चात्य राज्यामध्ये जसे स्थान निर्माण झाले आहे तसे भारतासारख्या विकसनशील देशामध्ये शिक्षणाला म्हणावे तितके महत्त्व प्राप्त झालेले नाही. याबाबतीत अरविंद वामन कुलकर्णी म्हणतात, ''शिक्षणप्रसार आणि विशेषत: भाऊराव पाटलांसारख्या माणसाने केलेले एकहाती लोकोत्तर कार्य यामुळे ग्रामीण परिसरातील बहुजनसमाजाची जागृती एका मर्यादेपर्यंत नक्कीच झाली. पण याबाबतीत स्वातंत्र्यपूर्व काळापासून कोणत्याही बदलाच्या दृष्टीने विशेष महत्त्वाच्या. बनलेल्या राजकारण या कार्यकारी घटकाची कर्तबगारी मोठी आहे. १९६० साली स्वतंत्र महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आले आणि सत्तेच्या विकेंद्रिकरणासाठी तालुका पंचायत आणि जिल्हा परिषद या राजकीय संस्थांची निर्मिती झाली. निवडणुकांचे राजकारण पार खेड्यापाड्यात खऱ्या अर्थाने पोहोचले. आपण कुणीतरी महत्त्वाचे आहोत ही जाणीव यातून ग्रामीण माणसाच्या ठिकाणी निर्माण झाली. त्याच्या ठिकाणी स्वत:च्या स्वतंत्र अस्तित्वाचे भान जागे झाले. यातूनच आपण असे म्हणू की, नागर अभिरूचीच्या समांतर अशा एका ग्रामीण अभिरूचीची जडणघडण होऊ लागली.[३]

बदलत्या ग्रामीण जीवनाचे शिक्षण हे जसे अपरिहार्य कारण आहे तसेच बदललेले राजकारण हे अप्रत्यक्षरित्या कारणीभूत ठरते. राजकारण हे केवळ बदलत्या ग्रामीण जीवनाचे अप्रत्यक्षरित्या कारणच ठरले नाही तर राजकारणाने ग्रामीण जीवनाचा तळ ढवळून काढला आहे. (अनेक स्थित्यंतरे होत आहेत.) त्यामुळे ग्रामीण जीवनाचे निर्मळ जल अधिकच गढुळ बनत आहे. अनेक राजकीय स्थित्यंतरे घडत आहेत.

भारत हा खेड्यांचा देश आहे. भारतातली बहुसंख्य जनता खेड्यात वास्तव्य करते. त्यामुळे लोकशाही पद्धतीच्या राजकारणामध्ये मताला महत्त्व प्राप्त झाले. त्यातून जनतेला आणि जनता रहात असलेल्या प्रदेशाला साहजिकच भारतातली बहुसंख्य जनता खेड्यात रहात असल्यामुळे खेडे भारताच्या राजकीय पटावरचे महत्त्वाचे प्यादे बनले. म. गांधींनी 'खेड्याकडे चला' अशी घोषणा केली. या घोषणेतला व्यापक हेतू बाजूला पडून राजकीय स्वार्थाने खेडे गिळंकृत करायला सुरुवात केली.

प्रमुख सत्ता केंद्रावरील राजकीय ताण कमी करण्यासाठी आणि लोकशाहीची पाळेमुळे खोलवर रुजविण्यासाठी सत्तेचे विकेंद्रीकरण करण्यात आले. तालुका पंचायत,

जिल्हा परिषद, ग्रामपंचायत यासारखी समांतर सत्तास्थाने निर्माण झाली. पण सत्तेचे विकेंद्रीकरण झाले तसे राजकारणाचेही विघटन झाले. खेड्यापाड्यापर्यंत - उंबरठ्यापर्यंत राजकारणाने प्रगती केली. यातूनच गटतट, ईर्ष्या, राजकीय हेव्यादाव्यांना सुरुवात झाली. आणि ग्रामीण जीवन ढवळून निघू लागले. याविषयी मोहन पाटील लिहितात, कारखाना झाल्यापासून गावात राजकारणाला ऊत आला होता. प्रत्येक गोष्टीला राजकारण नडत होता. त्यात भरीस भर भावकीची. भाऊबंद सगळे मातीलाच गोळा होतात. जिवंत असताना मेला का हे सुद्धा विचारणार नाहीत. गावात हूल उठवून जैनांच्या विरूद्ध काही करायचं झालं की मग एकमेकाला धरतात. मग एकी म्हणतात. मराठे सगळे एक म्हणून काठी आपटून गावावर वचक बसवतात. ज्याला खायला अन्न नाही ते सुद्धा मिशीवरून हात फिरवीत म्हारापोरांना दम भरतात. काम संपलं की पुन्हा पांगतात. मग आपण आपला स्वार्थ बघतात. काल रात्रीचे शत्रू पुन्हा त्यांचे मित्र होतात. मग आपल्या आपल्यातच पाय घालून एकमेकाला पाडतात. या धुडगुसात दांडगेश्वर शाबूत राहतात. कसली तरी आशा दाखवून बारकी बारकी माणसं ते हाताशी धरतात. काम साधलं की बारक्यांना ढकलून देतात. मग काहीतरी मिळेल या आशेनं गेलेली बारकी माणसं हवा मोजीत फिरू लागतात.'[४]

गावाच्या राजकारणाने प्रत्येक घटक व्यापलेला आहे. म्हणून 'खेड्याकडे चला' या गांधींच्या हाकेला राजकारणी, समाज सुधारक, विद्वान, लेखक खेड्यापर्यंत पोहोचेपर्यंत राजकारण्यांनी खेडे व्यापून टाकले आणि खेड्याचा चेहरा मोहरा बदलून टाकण्यात हातभार लावला. हजारो वर्षांची खेड्याची रचना या राजकारणाने बिघडवून टाकली आणि खेड्याच्या अभेद्य समूह जीवनाला तडे गेले ते केवळ राजकारणामुळे.

या राजकारणातून अभेद्य ग्राम व्यवस्थेला तडा गेला. गावकीत राजकारण शिजू लागले. सामान्य माणसाला त्याचे चटके बसू लागले आणि वजनदारी मंडळींनी यात आपला स्वार्थ शिजवून घेतला. गट तट निर्माण झाले. शेजारी पक्के वैरी झाले. भावकीतली एकी तळाला गेली. बदलत्या राजकारणापायी नातलगांना पार वाळीत टाकण्यापर्यंत मजल गेली. गब्बर अधिक मातब्बर होत गेले आणि सामान्य सामान्यच राहिले. गरीब-श्रीमंत यातली दरी वाढतच राहिली. निवडून येणारे गाड्या उडवू लागले आणि निवडून देणारे डोकी फोडून घेऊ लागले. कायमचे वैरी बनू लागले. गावातली शांती बिघडू लागली. या प्रस्थापित

राजकारण्यांविरूद्ध ब्र काढायची हिंमत सामान्य माणसांत उरली नाही. आर्थिक गुलामी अंगी भिनली. त्यामुळे सामान्य शेतकऱ्याने केवळ बघ्याची भूमिका स्वीकारली. जे होतेय ते गप्प पहात राहणे, त्याविषयी कोठेही वाच्यता करायची नाही, असाच स्वभाव बनला. यातून राजकारण्यांना रान मोकळे झाले आणि कुठेच विरोध नसलेला पाहून त्याची हिंमतही वाढू लागली.

राजकारण्यांना विरोध तर राहिलाच बाजूला पण त्यांची खातिरदारी (हांजी) करण्यासाठी स्पर्धा चालू झाली. राजकारण्यांशिवाय आपलं काही चालणार नाही, कुणास ठाऊक उद्याची वेळ कशी येईल. तेव्हा त्यांची मर्जी सांभाळलेली बरी असा विचार दृढ होऊ लागला आणि 'अन्नदाता' म्हणून हजारो वर्षे ओळखला गेलेला सामान्य शेतकरी दुसऱ्याचा 'अंकित' बनला.

एकेकाळी स्वयंपूर्ण असणारा हा शेतकरी ग्रामीण राजकारणामुळे दुसऱ्यावर अवलंबून राहू लागला. स्वावलंबन नाहीसे झाले. नव्या महाराष्ट्रात शेतकऱ्यावर वरकरणी जुलूम नसला, त्याच्या सुविधांकडे लक्ष पुरविले असले तरी, शेतकऱ्याला पूर्णपणे परावलंबी बनविले आहे. तो जरी स्वतंत्र राहून कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवितो म्हणत असेल तर एक ना एक दिवस त्याला राजकारणाचा आधार घ्यावा लागतोच, अशी व्यवस्था गावमाध्ये निर्माण करण्यात आली.

जानू पाटील गरोदर बायकोच्या पोटातं अचानक दुखू लागले असतानाही रात्रीच्यावेळी घरी माहीतगार मोठी व्यक्ती नसतानाही तिला सोडून, गावाला कारखाना मंजूर झाला म्हणून त्या मिरवणुकीत सहभागी होतो. मध्येच त्याला मंजुळेची आठवण होते. तिची काय परिस्थिती झाली असेल? अशी शंका उपस्थित होते. तो घरी जाण्यासाठी त्याचा मित्र दिनाच्या कानात कुजबुजतो. तेव्हा दिना त्याला 'शेतकऱ्याच्या जगण्याचा, ग्रामीण माणसाला या स्वार्थी राजकारणी दुनियेत तग धरण्याचा मूलमंत्र देतो. हा जसा मूलमंत्र आहे तसाच तो आजच्या ग्रामीण जीवनाचे धगधगते चित्रण करणारा करतो आहे. दिना, जानूची समजूत काढतो आणि सांगतो, की ही योग्य वेळ आहे. गावातल्या पुढाऱ्यांची मर्जी संपादित करायची. आता त्यांच्या डोळ्यापुढे दिसले तरच उद्या गावात किंमत आहे. त्यांचे वशिले खासदारापर्यंत आहेत. तेव्हा वेळ कशी येते कुणास ठाऊक यांची मर्जी सांभाळली पाहिजे.

तेव्हा जानूचे विचार परिवर्तन होते. तो विचार करतो, जानूला पटले. 'गावात राहायचं. रोज उठून तोंडं पहायची नाही म्हटलं तरी अडी-अडचण निर्माण होणार. मग त्यावेळी नेमकं आपणच यांच्या मनातनं उतरल्यावर पंचाईत व्हायची! मन घट्ट करून तो गर्दीत मिसळला.'[५]

आजचा शेतकरी राजकारणापायी आत्मविश्वास गमावून बसला आहे. अशा प्रकारे मोहन पाटील यांची लघुकादंबरी बदलत्या ग्रामीण जीवणाची वास्तवस्थिती चित्रित करते.

**२ ग्रामीण राजकारणाचे बदलते संदर्भ**

लोकशाही म्हणजे लोकांनी, लोकांसाठी चालवलेला राज्य कारभार. सामान्य माणसाचे भले ही लोकशाहीचा उदात्त हेतू. पण अर्थ खेड्यापर्यंत कधी पोहोचलाच नाही. दिल्लीपासून खेड्यातल्या गल्लीपर्यंत येईपर्यंत या लोकशाहीत अनेक उलथापालथी होऊन वेगळाच अर्थ सामान्य लोकांपर्यंत पोहोचता झाला. भारताला स्वातंत्र्य मिळून अर्धे शतक उलटून गेले तरी लोकशाहीची पाळेमुळे खडकाळ जमिनीत रुजलीच नाहीत. उपऱ्याचीच भूमिका अजून लोकशाही वटवत आहे.

मोहन पाटलांनी नेमका हाच मुद्दा आपल्या काही लघुकादंबऱ्यांच्या मर्मस्थानी कल्पून लिखाण केले आहे. ग्रामीण वास्तव जीवनाचे चित्रण ही जरी त्यांच्या लघुकादंबरीची थीम असली तरी राजकारणाशिवाय हे चित्र रेखाटणे अशक्य होऊन जाते. खालील उदाहरण राजकारणांविषयी सामान्य माणसाची झालेली समजूत दर्शविण्याला योग्य वाटते.

जानू पाटील, सामान्य शेतकरी, शेतात वर्षभर राबून काबाडकष्ट करून पिकतील तेवढ्या धान्यावर उपजिविका साधणारा, नवे काहीतरी करावे म्हणून हातपाय पसरणारा, कर्जाच्या कुबड्यांचा आधार घेणारा, जानू नियतीपुढे वखवखलेल्या ग्रामीण व्यवस्थेपुढे हतबल आहे. गावात कारखाना मंजूर झाला आणि जल्लोष सुरू झाला. कारखाना धनदांडग्यांचा, मंजूर करून आणणारे ते मलई खाणारे ते! पण आनंद मात्र गावकऱ्यांना. जल्लोष गावकऱ्यांचा अधिक. असे का? याच प्रश्नाचे उत्तर मोहन पाटील खूप साध्या सोप्या शब्दात सांगतात. ह्यातल्या काही ओळी ग्रामीण जीवनाची बदलती परिस्थिती विदीत करतात. लोकशाही, राजकारण, आमदार, खासदार या राजकीय मूल्यांविषयी सामान्य शेतकऱ्यांच्या मनात काय आहे? याचा कोणता अर्थ त्यांनी घेतला आहे हे सांगतात. ते

लिहितात... शऱ्या, हीच येळ हाय. आता कारखाना मंजूर झालाय. उद्या गावातली हीच माणसं खासदार फुडं उठबस करणारी हाईत. खासदाराफुडं हेच वशिलं हाईत. हेच्या पुढं पुढं केलं तरच आपल्यासारख्याचा फायदा. न्हाईतर उद्या आमाला ही इचारणार सुद्धा न्हाई'.[६]

जानू पाटलाची बायको मंजूळा गरोदर होती. अचानक तिच्या पोटात दुखू लागले होते. अशा अवस्थेत जानू तिला घरी एकटीला टाकून येतो. मिरवणुकीत सामील होतो. पण अचानक त्याच्यातला पती जागा होतो आणि मंजूळेच्या काळजीने घरी परतण्याची भाषा बोलू लागतो. तेव्हा त्याचा मित्र दिना त्याची समजूत काढण्यासाठी वरील सत्य विदित करतो.

राजकारणाने सामान्य माणसाभोवती किती घट्ट पाश आवळला आहे याचे हे ज्वलंत उदाहरण. घरी बायको अवेळी पोटात दुखू लागले म्हणून विव्हळत पडलेली. रात्रीची वेळ, घरी कर्तेसवरते कोणी नाही. जर दुर्लक्ष झाले, प्रसंग ओढवला तर मंजूळेच्या जीवावर बेतू शकते. इतका गंभीर प्रसंग ओढवला असतानाही जानू तिला तशाच अवस्थेत सोडून मिरवणुकीत सहभागी होतो.

म्हणजे सामान्य माणसापुढे संसार आणि ग्रामीण राजकारण या दोन गोष्टी ठेवून त्यातील एकच निवडण्यास सांगितले तर नक्कीच तो राजकारण निवडेल. संसार चालविण्यास कुठेतरी अप्रत्यक्षरित्या राजकारण सहाय्यभूत आहे. असा गृहितच त्यांनी करून घेतलेला आहे. त्यामुळे संसारापेक्षाही राजकारणाला महत्त्व प्राप्त झाले आहे. संसार चालविण्यासाठी राजकारणात भाग घेणे अपरिहार्य ठरते आणि राजकारणात सक्रिय सहभाग घ्यावा तर संसार उघड्यावर पडतो. धरलं तर चावतं... सोडलं तर पळतं. अशी द्विधा अवस्था शेतकऱ्याची बनली आहे. यातून तो नैराश्येला तरी जात आहे. व्यसनाधिनता, राजकीय वैर, हाणामारी यासारखे वेगळे परिणाम ओघानेच आले.

ग्रामीण माणूस राजकारणापुढे इतका नमला की त्याला त्याचे जोखड फेकून देणे अशक्यप्राय गोष्ट बनली आहे. ती परिस्थिती त्याने स्वीकारली. एवढेच नव्हे तर बळी जाणाऱ्या प्राण्याप्रमाणे त्याने ती परिस्थिती मान्यही केली. परिस्थितीला शरण जाण्याची त्याची सवयच बनून गेली. कालांतराने त्याची स्थितीच तशी बनली. राजकीय गुलामगिरी अंगात भिनली. एखादा या राजकीय व्यवस्थेविरूद्ध आवाज उठवूपहात असेल तर त्यालाच

SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

बंडखोर ठरवून त्याचा आवाज दडपण्याचा प्रयत्न होऊ लागला. मानेवरचे जोखड वाहणेच त्याला भूषणावह वाटू लागले. याबरोबरच रिकाम्या मानेवर जोखड कसे येईल याची तडजोड तो करू लागला. या अशा परिस्थितीचे चित्रण मोहन पाटील यांनी 'लिगाड' या आपल्या लघुकादंबरीतून केले आहे.

'लिगड' लघुकादंबरीचा नायक रघू हा खरेतर शिक्षक. शेतकरी कुटुंबात जन्म घेऊनही शिक्षण घेऊन मास्तर झालेला. पण नोकरी करीत असताना त्याला वरचेवर वाटायचे की, आपल्या गावाकडे नदी आहे. गावात सहकारी पाणी, सोसायटी आहे. आपली शेती आहे. पाण्याला तोटा नाही. शेती पिकविली तर गब्बर होऊन जाऊ. असा एकमार्गी विचार करून रघू गावाकडे परत फिरतो. शेती करू लागतो. पण लवकरच त्याच्या विचारांना तडा गेला. शेतीचे स्वप्न भंगू लागले. शेती करून गब्बर होता येत नाही याची प्रचिती आली. गावातले राजकारण त्याच्या प्रगतीच्या आड येऊ लागले. अन्यायाविरूद्ध आवाज उठवला तर घरातल्यांचा विरोध. त्यामुळे शिक्षित असूनही शहराचा अनुभव घेऊनही कायद्याची माहिती असूनही रघूला काहीही करता येत नाही. लेखक या संदर्भात लिहितो. आता मात्र माझाही तोल सुटला. अंगाची लाही लाही झाली. ह्या उन्हाळ्यात ही शेवटची कपात. ऊस पाण्यासाठी तोंड पसरून बसलेली आणि हा सहकारी पाणी सरळ खाजगी विहिरीत सोडून बसलाय. जुलूमच की! पुढारीपणाच्या जोरावर सगळं दडपून चालवतील काय? ह्या गावठी राजकारणाचं खूप ऐकलं होतं. खूप साहलं होतं. ते सारं उसवून बाहेर झालं. बापू आहेत याची फिकीर न ठेवता मी गरजलो, 'स्वत:ला कोण समजतोय हा दाजीतात्या? मी सरळ पंचनामा करून टाकतो. पोलिस घालतो त्याच्यावर!'

माझं डोकं संतापलं, भडकलं. जिभेवर नाही नाही ते येऊ लागलं. इतक्यात बापू उठून माझ्या पुढ्यात आले आणि डोळे ताणून म्हणाले,

'रघ्याऽ जास्त बोलशील तर जिभ गड्ड्यातनं हिसडून काढीन. तुला गंमत वाटली व्हय? त्यो सादा न्हवं. तेचा वरपातूर वशिला हाय. उगं झंझाळ नको. हां. काय तरी करचील आनी साऱ्या भावकीला शेकंल ते. भावकीतून घर वगळाय कमी करायचा न्हाई त्यो. उगं गप्प ऱ्हा. न्हाईतर जा तुझ्या तू नोकरीला!'[७]

रघूला ग्रामीण राजकारणाची बरीच माहिती आहे. तो ही सारी परिस्थिती ओळखून आहे. तरी नोकरीपेक्षा शेती करून खूप पैसा मिळविता येतो या एका आशेने तो गावी परतला. शेती करू लागला. पण राजकारणाचे एकेक अनुभव त्याला येऊ लागतात. आणि त्याचं बंडखोर मन नागाने फणा काढावा तसे अन्यायाविरूद्ध उभं ठाकलं. पण बापू म्हणजे त्याचे वडील. त्याला विरोध करतात. परत नोकरीला जाण्याचा दमही भरतात.

हा संघर्ष रघू आणि बापू यांच्यातला पिता-पुत्रातला नसून दोन भिन्न दृष्टिकोनातला, दोन विविध अनुभवांच्या अनुभवार्थातला आहे. बापूचे सारे आयुष्य खेड्यात गेल्यामुळे ग्रामीण व्यवस्था, जात, भावकी, ग्रामीण राजकारण याविषयीचे अनुभव त्यांना असणे स्वाभाविक आहे. बंडखोरी करून, फारसे काही पदरी पडत नाही. उलट नुकसान होते. भावकीत वैरत्व निर्माण होते. प्रसंगी वाळीत टाकण्यासारखा प्रकार होतो. यासारखे कटू अनुभव पाहिलेल्या, अनुभवलेल्या बापूला रघूचा आततायीपणा पटत नाही. त्यांच्या लेखी रघूला अनुभव कमी,चार पुस्तकं शिकला म्हणून ग्रामीण व्यवस्थेविरूद्ध लढा देणं मुर्खपणाचे होईल, असे बापूला वाटते. आणि तसाच सल्ला तो रघूलाही देतो.

पण रघूला हे मान्य नाही. 'दाजीतात्या' हा गावाचा मोठा पुढारी. अख्खा गाव त्याच्या शब्दाबाहेर जायचा नाही. एवढे त्याचे वजन. रघूने शिवाच्या साथीने 'दाजीतात्या'शी झुंज देणे म्हणजे भिंतीवर डोके आपटून घेण्यासारखेच होते. तरीही रघू हा शिक्षित असल्यामुळे कदाचित गाव सोडून काही वर्षे तो बाहेर नोकरीच्या निमित्ताने राहिल्यामुळे अन्यायाविरूद्ध चिड येणे साहजिकच आहे. पण सरड्याची धाव कुंपणापर्यंत या म्हणीप्रमाणे रघू, शिवा अशी एकटी दुकटी माणसे काहीच करू शकत नाही. कारण राजकारणाने ग्रामीण जीवनाचा श्वासन्श्वास कोंडला आहे. गावाची लोकसंख्या मर्यादित. त्यामुळे गाव सहजपणे पुढाऱ्यांच्या हाताखाली दबतो. त्यात गावची सारी व्यवस्था, बारा बलुतेदार, कष्टकरी, कामकरी या साऱ्यांवर याचे नियंत्रण. त्यामुळे आपोआप गाव पुढाऱ्यांच्या टाचेखाली यायचा. गावातल्या बहुसंख्य असणाऱ्या (धर्म, जात यांच्या आधारे) लोकांना चटचट नोकऱ्या देऊन, कामे देऊन, गोड बोलून, प्रसंगी धाक दाखवून हे अंकित ठेवायचे. त्यामुळे पुढाऱ्यापुढं बोलायची कुणाची हिंमत व्हायची नाही.

'गावात आल्यापासून ह्या दाजीतात्याची एक एक करणी कानावर. त्येच्या गावभर भानगडी. सगळ्या गावाच्या उरावर बसून ह्यो एकटा मलिदा खात बसलेला. बाकी चिल्लर माणसं. डोळं झाकून उगं सोसत काय करत्यात? सोसायटीचा चेअरमन. गांडीबुडी पैसा. वरपर्यंत वशिला. सारं रान मोकळंच त्याला. मनाला वाटलं तसं तो गावाला फिरवतोय. गाव हरण काळजी लागलेल्या माणसागत खंगत चाललाय. त्यचां नाव काढतं की जो तो तोंडात मिठाची गुळणी धरल्यागत गप्प. प्रत्येकाच्या  पायात पायखूणच अडकून ह्यो रिकामा. राऊ पाटील देवमाणूस. दाजीनं त्याला हाताशी धरलेला. जाधवांची, पाटलांची सगळी भावकी त्याच्या मागं. हरिजनवाड्यातला जाविंदा कांबळे पंचायतीत डेप्युटी सरपंच. अर्धा अधिक जो समाज दाजीतात्याच्या पाठीवर. मगदुमाचा बाबलू सेक्रेटरी. म्हणजे सारा जैन समाज ह्याच्याच मुठीत.  मग उरलं कोण? चार सुताराची घरं आणि नांगरे-मांगुरे अशी किडामुंगी. सगळ्यांच्या नाड्या ह्या अशा हातात धरून हा पिळत बसलेला.'[८]

मोहन पाटील यांनी केलेले वरील वर्णन हे आजच्या ग्रामीण व्यवस्थेचे भीषण चित्रण आहे. थोड्या-अधिक फरकाने खेड्यात हेच चालले आहे. बैलगाडीला बैलं जुंपावीत तसे सामान्य शेतकरी, गावव्यवस्थेला झुंपतेवेळी त्यांच्या नाड्या मातब्बरांच्या हाती. ते दाखवतील ती वाट गपगुमान चालायची. डोक्यावर भलीमोठी शिंगं असून उगारायची ताकद गमावून बसलेली.

गावगाड्यामध्ये मर्यादित लोकसंख्येमुळे प्रत्येकाचा संबंध हा गावातल्या पुढाऱ्यांशी येतो. शहरात या उलट परिस्थिती असते. शहरात राजकारणी असतात. पुढारी असतात. सामान्य माणसास वेठीस धरू पाहणारे तथाकथित राजकारणीही असतात. पण खेड्याइतकी त्यांची पकड नसते. याची अनेक कारणे देता येतील. त्यातही प्रमुख कारण म्हणजे शहराची लोकसंख्या अधिक असल्यामुळे त्यांच्यावर एकछत्री अंमल बसविणे अशक्य असते. शहरात उदरनिर्वाहाची अनेक साधने उपलब्ध असतात. खेड्यात बहुतांशी लोकांना शेतीवरच अवलंबून रहावे लागते. शेती हा व्यवसाय एक दोन व्यक्तींनी करावयाचा व्यवसाय नाही. शेतीला मनुष्यबळ जितके अधिक तितके चांगले. शेतीमुळे इतर व्यक्तींवर अवलंबून रहावे लागत असल्यामुळे  खेड्यातील मर्यादित लोकसंख्येशी शेतकऱ्याचा संबंध शिक्षणाचा प्रसार यासारख्या  गोष्टीमुळे शहरात राजकारण असून त्याला महत्त्वाचे स्थान प्राप्त होत नाही. या

उलट खेड्यात मात्र राजकारण महत्त्वाचे होऊन बसले आहे. त्यातच नेत्यांनी गावातल्या संघटित समाजातल्या पुढारी लोकांना हाताशी धरलेलं असतं. त्यांना ग्रामपंचायत, पाणी सोसायटी, सहकारी संस्थेत, लहान-सहान नोकऱ्या दिलेल्या. ते नेहमी खूष कसे राहतील याची सर्व तजवीज या पुढाऱ्यांनी केलेली असते, त्यामुळे म्होरक्याच्या मागे मेंढरांचा कळप लागेल तसे संघटित समाज पुढाऱ्यांच्या नादी लागतो. यावरच वरच्या पुढाऱ्यांचे राजकारण शिजते.

खरा भारत हा खेड्यात वसला आहे. गेल्या हजारो वर्षांपासून भारताची खरी ताकद खेड्यात प्रस्थापित आहे. ही ताकद खिळखिळी करण्यासाठी अनेक प्रयत्न झाले. खेड्यावर परकीय शत्रूंचे अनेकदा हल्ले झाले. खेड्यांच्या वेशीवर शत्रूच्या घोड्यांनी खूर वाजविले. पण खेड्यांच्या अंतर्गत व्यवस्थेवर याचा फारसा परिणाम झाला नाही. खेडी स्वयंपूर्णच राहिली. काही काळापुरती गावगाड्याची व्यवस्था विस्कळीत होताना दिसली पण पुन्हा ती प्रस्थापित झाली. इंग्रजांच्या राजवटीपर्यंत खेडी स्वयंपूर्ण होती. पण कावेबाज इंग्रजांनी ही मेख ओळखली. भारताचे, भारतीयांचे खरे अस्तित्व ही स्वयंपूर्ण खेडी आहेत हे ओळखून इंग्रजांनी खेडी उद्ध्वस्त करायला सुरुवात केली.

तत्कालीन खेडे स्वयंपूर्ण असायचे. खेड्याला लागणाऱ्या सर्व वस्तू, धान्य खेड्यातच तयार व्हायचे. त्यामुळे खेडे मदतीचा हात दुसऱ्याकडे पसरत नसे. यातच खरी शक्ती अंतर्भूत होती. इंग्रजांनी नेमके हेच ओळखले आणि खेड्याचा कणा उद्ध्वस्त करण्याचे सर्व प्रयत्न सुरु झाले. इंग्रजांनी बलुतेदारी संस्था मोडीत काढली. आयात माल खेड्यात तयार होणाऱ्या मालापेक्षा स्वस्त पडू लागला आणि खेड्याची स्वयंपूर्णता संपुष्टात आली.

यामागे इंग्रजांचा आणखी एक राजकीय हेतू होता की त्यावेळच्या ग्राम स्वावलंबनामुळे शेतकरी स्वतंत्र वृत्तीचा होता. महत्त्वाकांक्षी होता आणि त्याकाळी स्वातंत्र्याची भावना भारतीयांच्यात निर्माण होणे इंग्रजांच्या दृष्टीने हितकारक नव्हते. म्हणून त्यांनी बळीराजालाच मोडीत काढण्याची तत्वे अंमलात आणली.

थॅकरे याने रयतवादी पद्धत आणली. त्यामागे (इंग्रजांचा) राजकीय हेतू होता. शेतकऱ्याच्या स्वतंत्र वृत्तीचे समूळ उच्चाटन करण्याचाच हा एक भाग होता.

हे स्वातंत्र्यपूर्व काळात परकीय आक्रमकांनी स्वार्थासाठी केले. त्याचीच पुनरावृत्ती स्वकीयांनी स्वातंत्र्यानंतर राजकीय स्वार्थासाठी केली आणि खेडी अधिकच उद्ध्वस्त होऊ लागली. गावगाडा मोडकळीला येऊ लागला. बलुतेदार परागंदा झाले. बलुतेदारांनी व्यवसाय परिवर्तन केले. तरणी पोरं राजकारणाला बळी पडली. निवडणुकीच्या 'सुगीत गावात शुकशुकाट, धाब्यावर जत्रा' असेच चित्र दिसू लागले.

'शेताच्या बांधापासून ते मुख्यमंत्र्यांच्या खुर्चीपर्यंत आणि तिथून धरणापर्यंत, विजेपर्यंत ग्रामीण भागात राजकीय हैदोस सुरू आहे.'[९]

ग्रामीण राजकारणाने ग्रामीण लेखकांना नवा विषय प्राप्त करून दिला. कोलमडलेली मनं, विरत चाललेला जिव्हाळा, अंतर्गत अपव्यय संताप, खोट्याला मिळणारी प्रतिष्ठा, सत्याचा पराभव, भ्रष्टाचार, चंगळवाद, भोगवाद आणि दिवसेंदिवस खालावणारी शेतकऱ्याची स्थिती हे सारे चित्रण हाडाच्या ग्रामीण लेखकाला अस्वस्थ करीत आहे. 'गांधारीचे डोळे'- नागनाथ कोतापल्ले, 'विषवृक्षाच्या मुळ्या' -वासुदेव मुताटे, 'बगल'- अशोक व्हटकर, 'धिंगाणा'-राजन गवस, 'लिगाड', 'खांदेपालट', 'कोंडमारा' - मोहन पाटील अशा काही कादंबऱ्यांतून बदलत्या ग्रामीण राजकीय वास्तवाचे चित्रण प्रस्तुत होताना दिसते आहे.

### ३. शेतकऱ्याचे दारिद्र्य आणि त्याचे शोषण

स्वातंत्र्यप्राप्तीनंतरचे ग्रामीण जीवन, शेतकऱ्यांचे जीवन पाहता उतरंडीस लागलेले दिसून येईल. इंग्रजांनी 'गावगाडा' उद्ध्वस्त केल्यानंतर 'गावगाडा' प्रस्थापित करण्यासाठी सरकार दरबारी प्रयत्न झाले नाहीत. स्वातंत्र्याने शेतकऱ्याची घोर निराशा केली. विशेषत: गेल्या तीन दशकातले कृषी जीवन तर अधिकच घरंगळीला लागलं आहे. शेतकऱ्याची दैन्यावस्था वाढतच आहे. रात्रंदिवस इथला शेतकरी शेतीत राबतो आहे. काबाडकष्ट करतो आहे, रक्ताचं पाणी आणि हाडाची काडं करून शेती पिकवतो आहे. पण त्याला निसर्गाची पाहिजे तेवढी साथ मिळत नाही. हातातोंडाला आलेला घास पावसाच्या ओढीने करपून जातो. कमी, अवकाळी पावसाने पिकाबरोबर शेतकऱ्याचे वर्षभराचे कष्ट वाहून जाते. सरकारकडून मदतीची घोषणा होते. अनेक योजना येतात पण त्या मोठ्या शेतकऱ्यांच्या

शेतापुरत्याच मर्यादित राहतात. सामान्य शेतकऱ्याच्या उंबरठ्यापर्यंत या योजना पोहोचतच नाहीत.

या निसर्गाच्या फेऱ्यातून पीक सहीसलामत सुटलं. जरी पिकावर रोगांचा प्रादुर्भाव, नपरवडणारी किटकनाशके यातूनही पिक सुटल्यास त्या पिकाला मिळणारा बाजारभाव, तो कष्टाचा सोनं करणारा असेलच याची खात्री नाही.

एकूणच शेतकऱ्याची अवस्था दिवसेंदिवस बिकट होत चालली आहे. तो आर्थिक विवंचनेच्या कचाट्यात ओढला जात आहे.

हीच समस्या अनेक ग्रामीण साहित्यिकांच्या साहित्याची प्रेरणा बनली आहे. साहित्याचा जन्मच मुळी वेदनेला वाचा फोडण्यासाठी झालेला आहे. दलित साहित्य निर्मितीची प्रमुख प्रेरणा ही जशी शतकानुशतके झालेल्या अन्यायाला वाचा फोडणे ही आहे तशीच शेतकऱ्याच्या वेदनेला वाचा फोडणे ही ग्रामीण साहित्याची प्रेरणा आहे.

मोहन पाटील यांनीही याच विषयाचा आपल्या ग्रामीण लघु कादंबरीच्या लेखनातून उहापोह केला आहे. मोहन पाटलांनी ग्रामीण जीवनाची अनुभूती घेतलेली आहे. वास्तवाचे विदारक चित्रण त्यांनी 'याची देही याची डोळा' पाहिले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या या अवस्थेलाच लेखनीतून मांडण्याचा प्रयत्न मोहन पाटील करताना दिसतात.

'दिवसाबरोबरच जान पाटलांचं खळं उगवलं. सर्व मरण गोळा करून उफाळून त्यानं चोख जोंधळ्याचा ढिगारा केला आणि हातातली हातणी फेकून खळ्यातच गठळून बसला. बैतवाल्यानं सालभराचं बैतं घेऊन मोकळ्या मनानं मालकाकडं पाहावं तसं तो पुढ्यातल्या जोंधळ्याकडं पाहू लागला. खच्चून तीन पोती भरतील एवढंच दाणं. सालभरच्या काबाडकष्टाची कमाई.'[१०]

सामान्य शेतकऱ्याचं वास्तव चित्रण म्हणजे वरील वर्णन. जानू हा परंपरागत शेतकरी, स्वत:ची जमीन असणारा शेतकरी. कोंडमारा या लघुकादंबरीतून मोहन पाटील जानूच्या दारिद्र्याचं दर्शन घडवितात.

जोंधळ्याची रास जानूने केली आहे. शेतात जोंधळ्याचे खळे केले आहे. त्यातले धान्य निवडून पाखडून तो गोळा करतो आणि त्याची रास रचतो. ती चवड पाहून जानूचे हातपायच गार होतात. वर्षभर शेतात राबराब राबायचं, काबाडकष्ट करायचं आणि त्याचा

मोबदला काय? ढिगभर धान्य. जानू तेवढंसं धान्य पाहून गलितगात्र झाला. त्यानं हातातलं औजार फेकून दिलं आणि गठळून म्हणजे निर्जिव गाठोडं कुणीतरी फेकून द्यावं तसं खळ्यात बसला. कदाचित जानूच्या नजरेसमोर काबाडकष्ट, पिक पिकवू पर्यंत झालेल्या यातना उभ्या राहिल्या असतील. कदाचित भरपूर पिक आल्यावर काय काय करायचं? ह्या स्वप्नांचे झालेले तुकडे त्याच्या नजरेसमोर आले असतील. या एवढ्याशा धान्यत वर्षभर कसं खायचं? हा प्रश्न फेर धरून नाचत असेल. ही अवस्था जानूचीच नाही तर कृषीप्रधान शेतकऱ्याची अवस्था आहे.

मोहन पाटील पुढे वर्णन करतात की, 'जानू त्या धान्याकडे सालभराचं बैनं घेतलेल्या बैलवाल्यासारखं पाहतो'.

या एकाच वाक्यातून, मोजक्या शब्दांतून मोहन पाटील कृषी जीवनाचे फार मोठे विदारक चित्रण घडवितात.

'बैतं' घेण्याची पद्धत ही ग्रामीण व्यवस्थेतला एक घटक आहे. ज्यांची शेती नसते असे लोक बैतं म्हणजे ठराविक धान्य घेऊन शेतातली कामे जशी, रास, मळणी वगैरे कामं करून देतात. मोहन पाटलांनी जानूला बैतंवाल्याची उपमा दिलेली आहे. याचाच अर्थ असा की, शेतीहीन, ज्याची गावात शेती नाही अशा बैनंवाल्याचं उत्पन्न जानूसारख्या वाडवडिलार्जित शेती असणाऱ्या शेतकऱ्याबरोबर आहे. कृषी जीवनाची अवस्था इतकी वाईट झाली आहे की, ज्यांची शेती आहे त्याच्याबरोबर उत्पन्न, लाभ, ज्यांची शेती नाही पण शेतीची कामे करणाऱ्यांचे आहे किंबहुना असे 'उपरे' लोक शेतकऱ्यापेक्षा अधिक कमवतात. शेतकऱ्यालाच शेती करणे या देशात परवडत नाही. हे आजचे जळजळीत वास्तव आहे. म्हणजे नदीचा उगम कोरडा ठणठणीत पडावा आणि नदी मात्र दुथडी भरून वहावी अशी अवस्था इथल्या शेतकऱ्यांची बनली आहे. या देशाचा कणाच ढासळला आहे. मुख्य स्त्रोत वाळला आहे.

'सालभर रानात उठाबशा काढायच्या, नांगरट, कुळवट करून हाडं मोडून घ्यायची. माती फोलार करून पावसाची वाट बघायची. डोळ्यात जीव गोळा करून राखेतलं बी मातीआड झाकायचं आणि घरची जोडणी नाही म्हणून बैलवाल्याच्या हातापाया पडून

कुणाच्या तरी खळ्यावर सुगी उरकून घ्यायची अशी उस्तवारी करून अखेर शेवटी दाणं किती? तर हे ! युढ्यात पडलेलं. सालभरचं पोट.'[११]

शेतकऱ्याच्या दयनीय अवस्थेचे चित्रण वरील परिच्छेदातून घडते. सामान्य शेतकरी, पिडलेला, गांजलेला आहे. घरी दारिद्र्य, गावात पत नाही, शेतात खत नाही, घालावे म्हटले तर पैसा नाही. घरची जोडणी नाही. प्रत्येक गोष्ट दुसऱ्यावर विसंबलेली. त्यामुळे हातापाया पडल्याशिवाय काम होणार नाही.

एकीकडे काबाडकष्ट, रात्रंदिवस राबणूक, निसर्गाची हुलकावणी या साऱ्या परिस्थितीतून डोके वर काढू पाहणाऱ्या शेतकऱ्याचे शोषण होत आहे. अनेकविध मार्गांनी त्याचं शोषण केलं जात आहे. त्याला नागविलं जात आहे. त्याच्या अज्ञानाचा, अगतिकपणाचा, भोळ्या भाबड्या वृत्तीचा फायदा घेतला जात आहे. कधी तो सावध असताना तर बऱ्याचवेळेला तो बेसावध असतानाचा त्याला लुटलं जात आहे. शेतकरीही अगतिकतेपणे, अजाणतेपणी, कसायाच्या हाती मुंडी द्यावी तशी लुटारूंच्या हाती मान देत आहे. हे शेतकऱ्याला लुटणारे दुसरेतिसरे कुणी नसून त्याच्याच घामावर पोसलेले, शेतकऱ्यांचेच रक्त पिऊन माजलेले आहेत. यांना शेतकऱ्यानेच मोठं केलं आणि आज तेच शेतकऱ्यांचा बळी घ्यायला सरसावले आहेत.

अगदी ट्रॅक्टर ड्रायव्हरपासून ते कारखान्याच्या अध्यक्षांपर्यंत, पाटकऱ्यांपासून ते ग्रेडरपर्यंत सारेच शेतकऱ्याची राजरोस लूट करीत आहेत. या लुटारूंनी अनेक मुखवटे परिधान केले आहेत. त्यामुळे शेतकऱ्याला मूळ चेहरा ओळखू येत नाही. हे लुटारू आज प्रतिष्ठित, पांढरपेशे बनले आहेत. वेगवेगळ्या क्षेत्रातल्या मोठमोठ्या अधिकारपदावर ते चढलेले आहेत. या सर्वांनी शेतकऱ्याला नागवण्याचं धोरण अवलंबिले आहे. त्यामुळे शेतकऱ्याला सन्मानानं जगणं तर सोडाच पण 'माणूस' म्हणून जगणंदेखील दिवसेंदिवस अधिकाधिक अवघड होत चालले आहे.

गावात कारखाना आला. शेतकऱ्यांच्या उसाला दर मिळाला. कारखान्याबरोबर इतर सुविधाही आल्या. शेतकऱ्याचे रान नांगरून द्यायला कारखान्याचा ट्रॅक्टर होता. ज्याला नांगरायचे असेल त्याने कारखान्यात जाऊन पैसे भरून ट्रॅक्टर वापरायचा होता. पण यातही भ्रष्टाचार होता. अधिक पैसे देईल त्याच्या रानात आधी ट्रॅक्टर फिरायचा.

'माज्या तोंडावर का लिवलंय? खुळ्या, कारखान्यावर काय हाय? हितं गावातच सगळा ख्योळ हाय. सरळ बाबूरावाकडं जा. नेमापरमानं पैसे दे. आणि वर थोडी दक्षणा दे म्हंजे काचकूच काम हुतंय'.[१२]

नंगरी बाळीशानं राजकारणातलं सूत्र जानूला सांगितलं. जानूलाही ते पटलं आणि ही परिस्थिती सर्वसाधारणपणे सर्वत्र सारखीच आहे. रितसर काम करण्यापेक्षा लाच देऊन तेच काम कमी वेळेत करून घेण्यात आता आपण सारेच पटाईत झालो आहोत. पण याला भ्रष्टाचार म्हणायला मात्र आपण तयार नाही.

जानूनंही तेच केलं. लंगडी बाळीशाच्या सांगण्यावरून कारखान्याकडे न जाता बाबूरावाकडे जाऊन पैसे दिले. वर दक्षिणा. म्हणजेच लाच दिली अणि एकशे वीस रूपयाचे काम दोनशे रुपयाला पदरात पाडून जानू परत आला.

शेतकऱ्याचे शोषण करणारे दुसरे तिसरे कोणी नसून शेतकऱ्याच्याच जीवावर मोठे झालेले गब्बर आहेत. शेतकऱ्याच्या घामावर पोसलेले आता त्याचेच रक्त शोषायला सिद्ध झाले. बाबूरावही एक शेतकरीच. याच सामन्य शेतकऱ्याच्या जीवावर मोठा होऊन कारखान्याचे राजकारण करणारा बाबूराव आता त्याच शेतकऱ्याकडून पैसा वसूलत होता.

जानूला ट्रॅक्टर मंजूर होतो. घरात दोनशे रूपयांची जुळणी होत नाही म्हणून जानू गंजळेच्या (बायकोच्या) हातातल्या सोन्याच्या बांगड्या गहाण ठेवून पैसा उभा करतो आणि बाबूरावासारख्या चोराच्या हाती आणून देतो.

जानूच्या रानात नांगरट होते. अवैध मार्गाने नांगरणी करायची म्हटल्यावर ट्रॅक्टरचा ड्रायव्हर, रात्रीचीच नांगरणी करतो आणि जानूने उभे केलेले दोनशे रुपये मातीमोल करतो. नांगरट व्यवस्थित होत नाही सऱ्या नीट सोडल्या जात नाहीत.

''कारखान्याच्या ट्रॅक्टरनं नांगरलेलं स्वत:चं रान पाहताना जानूच्या काळजाला फाळ लागला. त्याचं काळीज दुभंगून गेलं बांधावर वठलेलं झाड असावं तसा तो शेताच्या कडेला उभा होता. बारक्या पोरानं पाटीला रेघोट्या माराव्यात तसं जानूच्या रानात नांगरीचे चरे उठले होते. आपल्या पोटावर चाकू सुऱ्यानं वाटेल तसे चरे पाडले आहेत. आपलं पोट लोकांना बघवत नाही. आपण पोटभर खात होतो, तेसुदा बघवलं नसेल. अर्धपोटी र हीलो तरी घरात रहात होतो. तेही आपल्या बापाच्या. तेही बघवलं नसणार. रान नीट नांगरलं नव्हतं.''[१३]

मोहन पाटील यांनी एका सामान्य अगतिक शोषित शेतकऱ्याच्या अवस्थेचे वर्णन केले आहे. जानूचे रान गरजेपेक्षा अधिक पैसे घेऊनही नांगरले गेले नव्हते. दागिने गहाण ठेवून हातापाया पडून उभे केलेले पैसे मातीमोल झाले होते. जानू हे सारे पाहून बांधावर स्तब्ध उभा राहतो. त्याला काय करावे काही सुचत नाही आपल्याच पोटावर चाकूने कुणीतरी वार करावेत असे त्याला वाटते साऱ्या लोकांनाच तो दोष देऊ लागतो. साऱ्या दुनियेला दुषणे देऊ लागतो. अगतिक, हतबल, पिढीत व्यक्ति दुसरं काय करु शकतो ? नशिबाला दोष देण्याखेरीज काय उरतं त्याच्या हाती ?

ही शोकांतिका केवळ जानूची नाही की मोहन पाटलांच्या लघुकादंबरीच्या कल्पित कथानकाची मनोरंजक अगतिकता नाही. ही वास्तवता आहे. भारतातल्या लाखो शेतकऱ्यांच्या वाट्याला आलेल्या उपेक्षेचे हे चित्रण आहे. जानू केवळ त्यांचे प्रतिनिधित्व करतो आहे. असे असंख्य जानू आपल्या भोवती वावरत आहेत, कुढताहेत वाट्याला आलेले भोग भोगताहेत.

### ४. घट्ट होत जाणारी जाती व्यवस्था :

मोहन पाटील यांच्या 'पाचुंदा' या लघुकादंबरी संग्रहातून ग्रामीण जीवनाचे यथार्थ दर्शन घडताना दिसते. त्यांच्या लघुकादंबऱ्यातून ग्रामीण व्यवस्था, गावगाडा, शेतकऱ्यांचे शोषण, दारिद्रय, स्त्रियांची अवस्था, राजकारण यासारखी आयशसूत्रे प्रकट होताना दिसतात. त्यातलेच एक आशयसूत्र म्हणजे 'जातीव्यवस्था'.

ग्रामीण संस्कृती आणि जातीव्यवस्था यांचे घनिष्ठ नाते आहे. नागरी जीवनामध्ये जातीव्यवस्थेची पाळेमुळे खिळखिळी झाली असली तर ग्रामीण व्यवस्थेवरील जातीव्यवस्थेची पकड अजूनही ढिली झालेली दिसत नाही. किंबहुना ती अधिकच घट्ट होत चालली आहे आणि याचेच प्रत्यंतर आपल्याला मोहन पाटील यांच्या लघुकादंबरीतून येते. आजही खेड्यांनी कात टाकली......... खेडी बदलली....... अशा आरोळ्या उठत असतानाही त्याच खेड्यात दृढ होत जाणारी जातीव्यवस्था आपल्याला दिसून येते. मोहन पाटील यांनी थेट जातीव्यवस्थेवर भाष्य केलेले नसले तरी संदर्भानुसार आणि प्रसंगानुरुप घटनातून जातीव्यवस्था डोकावताना दिसते. मोहन पाटील यांच्या लिखाणाचा उद्देश जरी जातीव्यवस्था निर्मुलन नसला तरी या अनिष्ट प्रथेविरुद्ध भाष्य करायला ते विसरत नाहीत

16109
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

आणि हीच त्यांच्या लेखनाची खुबी आहे. मर्म आहे. जाता जाता ते याही गोष्टीवर प्रकाश टाकतात आणि सांकेतिक का असेना पण या गोष्टीला उजेडात आणण्याचा प्रयत्न करतात. कोंडमारामध्ये जातीव्यवस्थेविरुद्ध लिहिताना मोहन पाटील म्हणतात.

'गावभर फिरुन कुंभारवाड्याच्या कोपऱ्यावर वळून मिरवणूक वेशीकडे जायच्या रस्त्याकडे तोंड करुन चालू लागली. लांब तिकडे महारवाड्याच्या कोपऱ्यात महाराजांची बायका-पोरं, म्हातारी माणसं अंधारात गुडूप होऊन थांबली होती.'[१४]

एकीकडे खेड्यात सुधारणा झाली. खेडी बदलली, खेड्यात रस्ते झाले, वीज आली अशा आरोळ्या उठत असताना मोहन पाटील वेगळेच चित्र आपल्यासमोर मांडतात. खासदारांची गावातून मिरवणूक निघते, गावभर फिरुन शेवटी ती वेशीजवळ कुंभारवाड्याच्या कोपऱ्यात येते. तर तिथे लांबवर महारवाडा असतो. आजही हा महारवाडा वेशीबाहेरच आहे. जिथे ती महारांची बायका पोरं अंधारातच गुडूप होऊन थांबलेली आहेत. म्हणजे गावात वीज आली. खासदारांची मिरवणूक थाटामाटात निघली, विजेची आरास मांडून डोलात साखर कारखाना उभा असताना महारवाडा मात्र अजून अंधारातच आहे. यातून जातीव्यवस्था किती घट्ट झालेली आहे. होत आहे हेच लक्षात येते. या विषयी आणखी उदाहरण पाहू.

'कारखाना झाल्यापासून गावात राजकारणाला ऊत आला होता प्रत्येक गोष्टीला राजकारण नडत होतं. त्यात भरीस या भावकीचीची........ गावात हूल उठवून जैनांच्या विरुद्ध काही करायचं झालं की मग एकमेकाला धरतात. मग एकी म्हणतात. मराठे सगळे एक म्हणून काठ्या आपटून गावावर वचक बसवतात. ज्याला खायला अन्न नाही ते खुद्द मिशीवरुन हात फिरवीत म्हारापोरांना दम भरतात.' [१५] काळ बदलत गेला, सामाजिक प्रबोधनाच्या फैरी झडत गेल्या तरी ग्रामीण भागातील जातीयतेचे भूत अजूनही पूर्णपणे गाडले गेले नाही. काहीवेळा तर ही जातीयता अधिकच घट्ट होत चाललीय की काय असे वाटू लागते. मोहन पाटील यांनी शिक्षणाचा प्रसार वाढला तरी ग्रामीण भागात घट्ट होणारी जातीव्यवस्था अत्यंत मार्मिकपणे रेखाटतात.

### ५. स्त्रीजीवन :

मोहन पाटील यांच्या 'पाचुंदा' तून व्यक्त होणारे स्त्री जीवन हे परंपरावादी, पुरुषसत्ताक समाजव्यवस्थेसाठी स्वतंत्र पतिव्रत्याला चिकटून असणारे, कुटुंबामध्ये गौण स्थान असलेले असे व्यक्त होते.

भारतीय संस्कृती ही पुरुषप्रधान संस्कृती आहे. आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी असलेली बागड स्त्रीदेखील या पुरुषप्रधान संस्कृतीत खऱ्या अर्थाने मुक्त नाही. अशा परिस्थितीत ग्रामीण स्त्री कुठे आहे ? हे मोहन पाटील यांच्या 'पांचुंदा' तून व्यक्त होते.

ग्रामीण स्त्री ही सर्वच दृष्टिकोनातून, सर्वच बाजूंनी परावलंबी आहे. कुटुंबातील कर्त्या पुरुषावर आधारलेली आहे. ती अज्ञानी आहे. दारिद्र्यात गांजलेली आहे. तिचा पैशाशी कधीच संबंध येत नाही. शेतमजूर स्त्रीला शेतमालकाकडून मजुरी घेण्यापुरता पैशाशी संबंध येतो हे खरे.. पण घरी आल्यानंतर मजुरीची जी काही रक्कम असेल ती तिला आपल्या कारभाऱ्याच्या स्वाधीन करावी लागते. कारभारी ती रक्कम मनमानेल तसे खर्च करतो. त्यामुळे ग्रामीण स्त्रीच्या आयुष्यात आर्थिक स्वातंत्र्य, स्वावलंबन या शब्दांना कुठेच स्थान नाही. ग्रामीण स्त्रीचे दु:ख, एवढे मोठे असूनही तिच्या परिस्थितीची दखल ग्रामीण साहित्याने म्हणावी तशी घेतली नाही. 'ग्रामीण स्त्रीच्या दु:खाचा वेध मराठी साहित्यानं घेतला का ? असा प्रश्न जेव्हा उपस्थित होतो तेव्हा या प्रश्नाचं आपल्याला नकारार्थी उत्तर द्यावं लागतं.'[१६]

अर्थात ग्रामीण साहित्यात ग्रामीण स्त्रीच यथार्थ चित्रण आलेलच नाही असे मात्र म्हणता येत नाही. परंतु तरीही ग्रामीण साहित्यातील स्त्रीचे चित्रण हे पारंपारिक पद्धतीचेच आहे. ग्रामीण स्त्रीकडे ज्या पारंपारिक नजरेतून पाहिलं जातं त्याच पारंपारिक नजरेतून ही स्त्री चित्रणे केलेली आहेत. मोहन पाटील ही याला अपवाद नाहीत. मोहन पाटील यांचा कथानायक जसा बंडखोरी करताना दिसत नाही. तसेच त्यांच्या लघुकादंबऱ्यातून परंपरेबाहेरची स्त्री किंवा परंपरा झुगारुन देणारी स्त्री कोठेही दिसत नाही. ग्रामीण स्त्रीचे वास्तव चित्रण जरी मोहन पाटील यांच्या लघुकादंबऱ्यातुन व्यक्त होत असले तरी ग्रामीण स्त्रीच्या अशा अवस्थेची कारणमिमांसा करताना मोहन पाटील कुठेही आढळत नाहीत.

मोहन पाटील यांच्या लघुकादंबऱ्यातुन चित्रित होणारी स्त्री ही दु:खी, मागासलेली, परावलंबी, परंपरावादी, पतिव्रता आणि एकूणच कुटूंबव्यवस्थेमध्ये महत्वाची भूमिका वठवूनही गौण स्थान असणारी आहे.

कोंडमारातील मंजूळा, 'लिगाड' मधील शकी, 'खांदेपालट' मधील चांभाराची राजी, भागीरथी, 'बस्तान' मधील राधी यासाऱ्या गांजलेल्या, पिडीत स्त्री व्यक्तिरेखा आहेत. ज्या मुकाट्याने वाट्याला आलेले भोग भोगताना दिसतात.

कोंडमारातील मंजूळेचे दु:ख डोंगराएवढे मोठे स्वत:चा पतीच ज्यावेळी संकटप्रसंगी एकटीला सोडून जातो त्यावेळी अशा स्त्रीने कुणाकडे पहायचे ? सहा महिन्याची गरोदर असणारी मंजुळा ज्यावेळी तिच्या पोटात दुखु लागते. रात्रीचे अचानक कळा सुरु होतात अशावेळी मंजुळेला डॉक्टराकडे न्यायचे सोडून जानू तिला एकटीला तशाच अवस्थेत घरी कोणीही नसताना गावातली मिरवणूक पहायला निघून जातो आणि पहाटेचं येऊन पहातो तो मंजूळेच्या पोटातला गोळा विरघळलेला असतो. पुढे तीन वर्षे ती अंथरुणाला खिळून राहते. तिच्या अंगातली शक्तिच नाहीशी होते. मोहन पाटील लिहितात.

'त्यावेळेपासून तिनं जे अंथरुण घातलं ते पुढं तीन वर्षे काढलंच नाही. तापातल्या खोकल्यानं तिचं रक्त गोठून हाडांना चिकटलं. हाड कातडं एक झालं. सगळ अंग पिळून निघालं. तेव्हा कुठे तिचं अंथरुण सुटलं.'[१७]

इतकी वाईट अवस्था मंजुळेची झालेली होती. पण तरीही मंजुळा या गोष्टीला कधीही संताप व्यक्त करीत नाही की, जानूला दोषी ठरवत नाही. ग्रामीण स्त्री किती सोशिक असते याचे हे उत्तम उदाहरणच म्हणावे लागेल. इथे मंजुळा बंडखोरीची भाषा करत नाही. जानूलाही दोषी ठरवत नाही. ती मनातून चरफडायची, कुढायची पण जानूच्या तोंडावर त्यातला एखादा शब्द उच्चारायची तिची छाती नव्हती. इतके होऊनही ती संसारात रमलेली. जानूचा संसार नेटान चालवणारी.

पुढे जानूला नांगरणीसाठी दोनशे रुपयांची गरज पडते. पैसे नाहीत म्हणून तो हतबल हताश होतो आणि अशावेळेला मंजुळाच त्याच्या मदतीला धावून जाते. क्षणभर नवऱ्याची अवस्था बघून तिच्या डोळ्यात पाणी तरळतं, पण चटकन बोटानं पाणी उडवून ती जानूला ठामपणे म्हणते.

'कुठं पैसे मिळत्यात का बगा. न्हाईतर ह्या पाटल्या मोडा जावा, रानातल्या मशागती खुंटल्यात हाताला सोबा काय करायची ?'[१८]

ग्रामीण स्त्रीचा फार मोठा त्याग मोहन पाटील आपल्या कोंडमारा या लघुकादंबरीतून व्यक्त करतात. ज्या नवऱ्याने पत्नीच्या जीवावर बेतले असता तिला तशीच सोडून दिली. त्याच नवऱ्यावर आर्थिक संकट आले असता तीच पत्नी हातातल्या पाटल्या काढून देऊन पैसे उभे करण्यास सांगते. मंजुळेचा त्याग, नवऱ्याला सर्वस्व समजणारी तिची वृत्ती आणि येईल त्या प्रसंगाला धीराने तोंड देण्याची तिची धडाडी खरोखरच वाखाणण्यासारखी आहे.

मोहन पाटील यांच्या 'लिगाड' या लघुकादंबरीतील 'शकी' ही सुद्धा एक पिडीत, अत्याचारित स्त्री आहे. बबन नावाच्या व्यक्तीवर तिचं खरं प्रेम असतं. त्या दोघांनी पळून जाऊन लग्न करण्याचा निर्णयही घेतलेला असतो. ही गोष्ट गावातले राजकीय पुढारी दाजीतात्यांना समजते. दाजीतात्या त्यांना मदत करतो म्हणून शेतावर त्यांना बोलावून घेतो आणि बबनला मारून शकीवर अतिप्रसंग करतो. आणि शकीला जन्मातून उठवतो. सारा गाव बबनवरच संशय घेतो. दाजीतात्या नामानिराळा होतो.

शकिला सारे माहीत असते. ती साऱ्यांना सत्य सांगण्याचा प्रयत्न करते पण कोणीही तिचे ऐकत नाही. तिचा सख्खा भाऊ बजरंगही ही गोष्ट मान्य करत नाही. उलट शकिलाच दोषी ठरवून मार मार मारतो.

शकीचं दुःख दुहेरी आहे. एकीकडे दाजीतात्या तिच्यावर अत्याचार करतो तर दुसरीकडे सख्खा भाऊ सत्य जाणून घ्यायला तयार नाही. तिला आता जगायची चोरी झाली होती म्हणून ती म्हणते, 'व्हय, तेनंच. पर माजं कुणालाच काय खरं वाटत नाही? बजादादा तर सारखा मारतोय मला, ढोरागत, रघू. आता मला जगावं वाटंना'[१९]

एका अत्याचारित ग्रामीण स्त्रीची घुसमट मोहन पाटील यांनी मांडलेली आहे. शकी निमूटपणे सारे सहन करत आहे.

मोहन पाटलांनी मांडलेल्या 'खांदेपालट'मधील चांभाराच्या राजीचे दुःखही शकीसारखेच आहे. तीही अत्याचारित पिडीत आहे. धोंडीनानाच्या वासनेला बळी पडलेली आहे. परंतु तिला हे सहन न झाल्याने विहिरीत उडी मारून तिने जीवन संपवले आहे. राजी या गोष्टीविषयी ब्र काढत नाही. शेवटपर्यंत धोंडीनानाचे नाव बाहेर येत नाही. आणि राजी

स्वत:वरच्या अन्यायाला वाचा न फोडताच निघून जाते. जरी तिने तसा काही प्रयत्न केला असता तर तिचीही अवस्था शकीसारखीच झाली असती.

राजीने आत्महत्या का केली? या प्रश्नाकडं गावातील कोणीच गांभिर्यानं पहात नाही जणू काही 'राजी'ला (एकूणच ग्रामीण स्त्रीला) पुरुषप्रधान संस्कृतीत काहीचं महत्त्व नाही म्हणूनच मोहन पाटील लिहितात,

'राजी मातीआड झाली.'

'पुढं आठ पंधरा दिवस माणसं उलटसुलट बडबडली. हळूहळू साऱ्यांनाच त्या गोष्टीचा विसर पडला. गाव शांत झाला.'[२०]

एकूणच ग्रामीण स्त्रियांना ग्रामीण संस्कृतीमध्ये अत्यंत कमी दर्जा आहे. किंबहुना ग्रामीण स्त्रियांना स्वतंत्र अस्तित्वच नाही म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

मोहन पाटील यांनी आपल्या लघुकादंबऱ्यांतून ग्रामीण स्त्रीचे विदारक चित्रण केले आहे. त्यांच्या एकूण लिखाणाचा उद्देश जरी ग्रामीण स्त्री जीवन चित्रण नसला तरी अगदी योग्य तिथे आणि योग्य पद्धतीने त्यांनी ग्रामीण स्त्री जीवनाचे दु:ख मांडण्याचा प्रयत्न केला आहे. कुटुंबाला आधार देणारी स्त्री असली तरी बाहेरचा पुरुष घरी आल्यावर बाहेरच्या खोलीतही येण्याचे स्वातंत्र्य स्त्रीला नाही. म्हणजे पुरुषप्रधान संस्कृतीत स्त्रीला दुय्यम स्थान असते, अशी आपली सर्वसाधारणपणे समजूत आहे पण मोहन पाटलांच्या लघुकादंबऱ्यातील स्त्रियांना दुय्यम तर नाहीच समाजाच्यादृष्टीने त्यांना कोणतेच स्थान नाही. म्हणजेच सारे असूनही या स्त्रीया अस्तित्वहीन जीवन जगताना दिसतात.

### ६. ग्रामीण माणसाची अगतिकता

चार वर्षांपूर्वी जानूच्या गावाला कारखाना मंजूर झाला. भांडवलदारांनी वरपर्यंत वशिले लावून कारखाना मंजूर करून आणला. शेतकऱ्यांना आनंद झाला. 'उसाला उचल आणि टनाला पैसा मिळणार'. पण त्यांना कुठे माहीत होतं की कारखाना त्यांना पैसे मिळवून द्यायला नाही तर पैसा लुटायला आलाय.

सारा गाव त्या रात्री जल्लोष करीत होता. जानूही काय भानगड आहे ती बघावं तरी म्हणून मिरवणुकीत सहभागी झाला होता. पण जड मनाने वरून तो मिरवणुकीत सहभागी होता पण अंतरंगामध्ये त्याच्या प्रचंड भीती, काळजी होती. शरीराने तो मिरवणुकीत पण

मनाने मंजुळेपाशी होता. मंजुळा त्याची पत्नी सहा महिन्यांची गरोदर होती. आणि त्या रात्री अचानक तिच्य पोटात दुखू लागले होते. दिनाच्या बोलावण्यावरून जानू मिरवणूक पहायला आला होता. मंजुळेला तशा अवस्थेत घरी एकटीला सोडून. त्याचे मन वारंवार मंजुळेकडे ओढ घेत होते. त्याने घरी परतायचा निश्चय केला. पण दिनाने सांगितलेली गोष्ट त्याला पटली आणि मनावर ओझे ठेवून तो मिरवणुकीत सहभागी झाला.

दिनाने त्याला ग्रामीण वास्तवाचे चित्रण घडविले. आजच्या ग्रामीण जीवनाचे सार उद्‌घृत केले. ग्रामीण राजकारणाचे बिभत्स रूप दाखविले आणि शेतकऱ्याच्या अगतिकतेचा दाखला दिला.

दिनाने सांगितले, गावातली ही माणसे उद्या खासदारांपुढं उठबस करणार आहेत. यांचे वरपर्यंत वशिले आहेत. यांच्या पुढं पुढं (हांजी, हांजी) केलं तरच आपल्यासारख्याचा फायदा आहे.

जानूला हा मुद्दा मनोमन पटला. आज ना उद्या नाही म्हटलं तरी अडी-अडचणीची वेळ येणार. तेव्हा यांची मर्जी सांभाळून असावे असा पोक्त (?) विचार त्याने केला. मंजूळेकडे दुर्लक्ष केले.

पण जानूला हा विचार महागात पडला. मंजूळाकडे त्याचे दुर्लक्ष झाले आणि पाण्यात मिठाचा खडा विरघळावातसा त्याच्या पोटचा गोळा विरघळून गेला. जानूला मोठा पश्चाताप झाला.

जानू सामान्य शेतकरी. अगतिक, हतबल होता. मिरवणुकीत सहभागी झाला असता, मंजूळेकडे लक्ष दिले असते तर जानूचे बाळ वाचले असते. पण मंजूळेच्या जिवावर बेतले असतानाही तो गावात मिरवणुकीत सहभागी झाला यातूनच त्याच्या अगतिकतेची कल्पना येऊ शकते.

आता डौलाने उभ्या असलेल्या कारखान्याकडे पहात जळफळण्याऐवजी त्याच्या हाती काहीच नव्हते. एका अगतिकतेभोवती जानू आयुष्यभरासाठी अगतिक, हतबुद्ध बनला होता.

DR. ... BALASAHEB ... LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

जानू नांगरणीसाठी दोनशे रुपये उभे करतो. पत्नीचे दागिने गहाणवट टाकून पैसे उभे करून बाबूरावाकडे नेऊन देतो. अवैध मार्गाने ट्रॅक्टर जानूच्या रानात नांगरणीला येतो. याचा बोभाटा होऊ नये म्हणून ट्रॅक्टरचा ड्रायव्हर रात्रीचीच नांगरणी करतो आणि निघून जातो.

पण ती नांगरट धड होत नाही. सऱ्या सरळ सोडल्या जात नाहीत. आणि जानूचे दोनशे रुपये मातीमोल होतात. जानूला ते रान पाहून आपल्या पोटावर चाकू-सुऱ्यानं वाटेल तसे चरे पाडले आहेत. असेच वाटू लागते. वठलेल्या झाडासारखा तो बांधावर उभा राहतो.

जानूवर फार मोठा आघात झालेला आहे. अन्याय झालेला आहे. मोहन पाटील या अन्यायाला वाचा फोडतात. सामान्य शेतकरी कसा पिळला जात आहे याचे चित्रण मांडतात. पण त्या अन्यायाविरूद्ध आवाज उठवत नाहीत की त्यांचा कथानायक बंडखोरी करत नाही. अन्यायाविरूद्ध आवाज उठविणे राहिले बाजूला पण हा कथानायक आपलेच काय चुकले? आपले हे सगळे असेच का? घर आणि माळाचे रान आपल्याला शाप आहे असे त्याला वाटू लागलं. आपल्यावरच्या झालेल्या अन्यायाची तो उत्तरे शोधण्याचा प्रयत्न करू लागतो. आपले भाऊबंद आपल्याला शाप देतात, कारखान्यामुळे आपल्याला साडेसाती लागली, यासारख्या अंधश्रद्धेच्या गोष्टी बोलू लागतो.

पण पैसे देऊनही असे का नांगरले? याचा जाब तो कोणालाही विचारत नाही. याचाच अर्थ असा की, जानू हा परंपरागत शेतकरी आहे. सामान्य, अगतिक, हतबल, खाल मानेने अन्याय सहन करणारा शेतकरी आहे. अन्यायाविरूद्ध आवाज उठविणे किंवा प्रवाहाविरूद्ध पोहणे हे त्याला जमत नाही म्हणण्यापेक्षा त्याच्या रक्तातच ते नाही. जे होईल ते गुमान मुकाट्याने सहन करावे हिच भूमिका तो प्रत्येकवेळी वठवतो आहे.

मोहन पाटील यांनी शेतकऱ्याच्या अगतिकतेचे यथार्थ चित्रण घडविले आहे. पण केवळ अन्याय कसा झाला आणि कथा नायकाने तो कसा सहन केला याचेच चित्रण मांडणे म्हणजे ती कलाकृती जीवनवादी, अभिजात म्हणता येणार नाही. केवळ शोषितांचे वर्णन करणे वेगळे आणि शोषणांविरूद्ध बंड पुकारणे निराळे. या दोन्ही गोष्टी परस्परपूरक असल्या तरी परस्परभिन्न आहेत.

## ७ शेतीचे बदलते स्वरूप

स्वातंत्र्यानंतर भारतीय ग्रामीण जीवनात, राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक आणि कृषी क्षेत्रामध्ये बदलाचे वारे वाहू लागले.

१९९५-९६ च्या दरम्यान नरसिंहराव सरकारच्या कारकिर्दीत भारताचे गैर करार स्वीकारला. त्यातून मुक्त अर्थव्यवस्था, उदारीकरण, जागतिकीकरणाचा रेटा वाढत राहिला. या जागतिकीकरणाविषयी उद्याच्या नागरिकांकडून काही अपेक्षा व्यक्त केल्या जात आहेत. याला ग्रामीण जीवनही अपवाद नाही. व्यक्तीच्या आर्थिक व सर्वांगीण विकासाकरिता व्यक्तीकडून काही गोष्टींची अपेक्षा केली गेली आहे. त्यातील महत्त्वाचे म्हणजे –

१) व्यक्तीमध्ये तांत्रिक वा तत्सम कौशल्य वाढले पाहिजे. यामध्ये शेतकरी, कष्टकरी अंतर्भूत आहे.

२) अर्थबळ निर्माण करण्यासाठी व्यक्तीने किमान साधनांचा कमाल कौशल्याने वापर करायला हवा.

३) आपली, आपल्या मालाची गुणवत्ता वाढविण्यासाठी जगाशी, जगातील तंत्रज्ञानाशी, संगणकाशी सुसंगतता व स्पर्धा केली पाहिजे.

जागतिकीकरणाच्या स्पर्धेमध्ये टिकायचे असेल तर वरीलप्रमाणे परिवर्तन घडून आले पाहिजे. आता भारतासारख्या कृषोप्रधान देशानेही कळत-नकळत या स्पर्धेमध्ये उडी घेतली आहे ज्याचे कळत नकळत परिणाम जाणवू लागले आहेत.

कृषीजीवन हा महाराष्ट्राचा आणि भारताचा कणा आहे. भारतीय शेती ही पारंपरिक पद्धतीची होती. अजूनही बहुतांशी भागात आहे. परंतु भारतीय समाज जीवनामध्ये जसे बदल होत गेले तसे भारतीय कृषी जीववनामध्येही अमूलाग्र बदल होत गेले. विशेषत: हरितक्रांतीच्या उदयानंतर शेतीमध्ये नवे तंत्रज्ञान अवलंबून शेतीचे स्वरूप बदलत गेले.

भारताची लोकसंख्या जशी वाढत गेली तशी शेतीतील उत्पादित उत्पन्नावर ताण पडू लागला. अधिकाधिक उत्पन्न घेण्यासाठी शेतीत वेगवेगळे प्रयोग करण्याची आवश्यकता भासू लागली. या गोष्टीचा विचार करूनच आधुनिक शेतीतंत्राला चालना देण्याची सर्वप्रथम शिफारस शेतीतंत्रज्ञांनी केली. कमी क्षेत्रात कमी वेळेत भरघोस उत्पन्न देणाऱ्या कृषी तंत्राला चालना देण्यासाठी अनेक योजना आखल्या गेल्या.

मोहन पाटील यांनी याच कृषी जीवनातील आधुनिकतेचे चित्रण आपल्या लघुकादंबऱ्यातून मांडले आहे. कृषी जीवनाचे यांत्रिकीरण जतन केले आहे. या बदलत्या संदर्भाचा वापर मोहन पाटलांनी आपल्या लघुकादंबऱ्यांतून केलेला आहे. ग्रामीण साहित्य हे कृषीकेंद्रित असते. कारण गावाचा कणा, गावाचे सर्वस्व म्हणजेच शेती आणि हीच शेती बहुतांशी ग्रामीण साहित्याची प्रेरणा बनलेली आहे. शेतीची, पारंपारिकता, शेतीतील समस्या, आधुनिकता, यांत्रिकता या साऱ्या घटकांचा समावेश ग्रामीण साहित्यात होताना दिसून येतो. मोहन पाटील हेही याला अपवाद नाहीत. याविषयी मोहन पाटील म्हणतात की, 'ग्रामीण साहित्य कृषीकेंद्रित आहे असे म्हणावे लागते त्याचे कारण त्या साहित्याची प्रेरणाच कृषी ही आहे'.[२१]

शेती 'खेडूत' (कसून, मशागत करून) पीक घेणे ही या देशाची परंपरा आहे. आणि या 'खेडणे' या शब्दावरून 'खेडे' हा शब्द आला.

'एकूणच 'शेती', 'खेडे' आणि 'ग्रामीण साहित्य' या परस्परावलंबी घटक आहेत आणि हाच धागा पकडून मोहन पाटलांनी लघुकादंबरीचे लेखन केल्याचे लक्षात येते.

'भांगलन आटपून युरियाचं पोतं इस्कटायच्या नादात होतो.'[२२]

पूर्वी सेंद्रिय खते असायची. शेणखत, झाडपाला कुजवून केलेलं खत शेतीत वापरलं जायचं. पण आधुनिकता आली, शेतीतली खतेही बदलली. सेंद्रिय खतांची जागा रासायनिक खतांनी घेतली. कमी क्षेत्रात अधिक उत्पन्नाच्या हव्यासाने आधुनिक शेतकरी रासायनिक खतांचा भरपूर वापर करताना दिसतो आहे. त्यातीलच एक खत म्हणजे 'युरिया'. युरिया, सल्फेट, पोटॅशियम यासारखी रासायनिक खते मातीला आवश्यक ते घटक, तात्पुरत्या स्वरूपात उपलब्ध करून देतात जी पिकांना आवश्यक असतात.

नदीच्या पाईपलाईनमुळे 'सहकारी पाणीपुरवठा केंद्र' अस्तित्वात आली. यालाच 'पाणी सोसायटी' असे म्हटले गेले. प्रत्येक शेतकऱ्याला अल्प मोबदल्यात पाणी मिळू लागले.

'नोकरीत असताना सारखं वाटायचं : आपल्या गावाला नदी आहे. गावात सहकारी पाणी सोसायटी आहे. नदीवर जॅकवेल आहे. पाणी खेचणाऱ्या वीस वीस हॉर्सपॉवरच्या तीन मोटारी, मोठा मोटारपंप. हे जॅनवेल म्हणजे बागाईतदारांना नदीवर बसवलेलं नशीब'.[२३]

लिगाडचा नायक वरील ओळीत रघू सांगतो की, जॅकवेल म्हणजे शेतकऱ्यांचं नशीब आहे. रघूसारख्या सामान्य शेतकऱ्यालाही जो परंपरागत शेतीसाठी पावसावर अवलंबून होता अशा शेतकऱ्यांनाही पाणी मिळू लागले. शेताच्या पाटातून पाणी खळाळू लागले. पिकहांना जीवदान मिळाले.

हे सारे आधुनिक शेतीतूनच साध्य झाले. मोट, बैलांची नांगरणी, खते, बी-बियाणे या साऱ्या गोष्टींमध्ये आधुनिकता आली.

## ८. शेतीतील यांत्रिकीकरणातून निर्माण झालेल्या समस्या

देशामध्ये हरित क्रांतीच्या उदयानंतर शेतीमध्ये अमूलाग्र बदल झाले. या बदलांमधून शेतीचे उत्पन्न नक्कीच वाढले. परंतु या आधुनिकीकरणाचे वारे केवळ उत्पादन वाढीच्या दिशेनेच वाहत राहिले आणि ते परिस्थितीस अनुलक्षून होते. नवनवीन तंत्रज्ञानाचा शोध आणि विकास एका बाजूला तर व ढत्या लोकसंख्येमुळे घटत्या शेतीच्या कार्यक्षेत्रावर पडलेला ताण यातूनच कमी क्षेत्रामधून अधिक उत्पादन मिळविण्यासाठी नवे प्रयोग सुरू झाले. शेतीत ट्रॅक्टर, रासायनिक खते, संकरीत बी-बियाणे, ठिबक सिंचन, ग्रीन हाऊसेस, कोल्ड स्टोअरेज यासारखी आधुनिक तंत्रज्ञान विकसित झाले. ज्याचा परिणाम ग्रामीण आर्थिक जीवनावर व सामाजिक जीवनावर झाला.

खेड्यात शहराच्या धर्तीवर सुधारणा होऊ लागल्या. खेड्यात रस्ते आले. वीज आली. शेतकऱ्याच्या घरी विद्युत उपकरणे आली. चारचाकी, दोनचाकी वाहनांची गर्दी वाढली. ऊस, टोमॅटो, द्राक्षे यासारख्या नगदी पिकांमुळे शेतकऱ्याच्या हातात पैसा खेळू लागला. पोटापाण्याची काळजी त्याला सतावेनाशी झाली. तो निष्काळजी बनला आणि यातूनच अनेक समस्यांचा उदय झाला.

मोहन पाटील यांनी आपल्या लघुकादंबऱ्यांतून अशा समस्यांचा वेध घेण्याचा प्रयत्न केला आहे. शेतीतील यांत्रिकीकरणामुळे बारा बलुतेदारी पद्धत जी शतकानुशतके अस्तित्वात होती. ज्यामुळे खेडे स्वयंपूर्ण होते अशी पद्धत मोडीत निघाली. नांगर बनविण्याचे काम पूर्वी गावात सुतार करायचे. त्याच्यावर त्याचे पोट भरायचे. पुढे या नांगराला लोखंडी फाळ लावण्याचे काम लोहार करायचे. त्यावरच त्यांची उपजिवीका चालायची. पुढे ह्या नांगराला बैलांला जुंपण्यासाठी कातडी सापत्या (वादीची) आवश्यकता

होती. ती चांभार बनवायचा, बैलांना लागणाऱ्या काढण्या, कासरे मांग जमातीचे लोक बनवायचे. म्हणजे एका नांगरामुळे एवढ्या लोकांची उपजीविका चालायची. आता नांगराची जागा ट्रॅक्टरने घेतली आणि त्यावर उपजिविका करणारे लोक उद्ध्वस्त झाले. देशोधडीला लागले. त्यामुळे गावाची जी एक स्वयंपूर्ण व्यवस्था होती ती उद्ध्वस्त झाली. स्वयंपूर्ण खेडे आता आयात तंत्रज्ञानावर अवलंबून राहू लागले.

याचा आणखी एक परिणाम म्हणजे सामान्य गरीब शेतकऱ्याला आधुनिक तंत्रज्ञान परवडणारे नव्हते. नांगरणी (बैलांची) त्याच्या आर्थिक आवाक्यात होती पण ट्रॅक्टरचे भाडे त्याला परवडणारे नाही.

'शेतकी करायची म्हंजे काय चेष्टा हाय? जानू बाबा नोटांचं पुडकं सोडाय लागल्यात तवा ते जमतंय!'[२४]

जानूला नंगरी बाळीशा ट्रॅक्टरच्या नांगरटीचा खर्च सांगताना अधुनिक शेतीतील खर्चाविषयी सांगतो आहे. नोटांचे पुडके सोडल्याशिवाय शेती होत नाही.

शेतीचा खर्च निभावण्यासाठी कर्ज काढणे, सावकारी कर्ज घेणे, घर, किमती वस्तू गहाण टाकणे असे प्रकार शेतकरी करू लागला आणि त्याच्या दारिद्र्यात भर पडत गेली. कर्ज काढून भरपूर पैसा पेरून केलेली शेती अनेक कारणांनी उद्ध्वस्त होते. हातातोंडाशी आलेलं पीक वाळून, करपून, कुजून जाते आणि कर्ज फेडणे राहिले बाजूलाच उलट त्यात भरच पडत जाते.

मोहन पाटील यांनी बदलणाऱ्या शेतीचे जसे चित्रण केले आहे तसेच शेतकऱ्याच्या बदलणाऱ्या मानसिक स्थितीचेही वर्णन केले आहे. आधुनिकता केवळ शेतीतच दिसत नाही तर शेतकऱ्याच्या मनांतही ती डोकावते आहे.

'हे बघ शाना असलास तर बैलाच्या नादाला लागू नकोस. ट्रॅक्टरचं येगळं पडतंय. जरा फाळ ढिल्ला करून सोडला की रानाच्या आईचं दूध अटीवतोय ट्रॅक्टर'.[२५]

नंगरी बाळीशा जानूला ट्रॅक्टरविषयी सांगताना म्हणतो की बैलापेक्षा ट्रॅक्टर बरा. ट्रॅक्टरची गोष्टच वेगळी पडते. कसलेही रान असले तरी ट्रॅक्टरने नांगरता येते. या उलट माळरानावर बैलांची नांगरट कुचकामी ठरते. आणि बैलांच्या नांगरणीपेक्षा ट्रॅक्टरचा फाळ

खोलवर जातो. आणि कमी वेळेत काम पूर्ण होते. म्हणून नंगरी बाळीशा जानूला नांगरणीसाठी ट्रॅक्टरचा उपयोग करायला सांगतो.

पूर्वी पाणी पुरवण्याची साधने उपलब्ध नव्हती. कालवे नव्हते. बहुतांशी शेती पावसावर आधारलेली. आता नदीवर धरणं बांधली. पाण्याचं नियोजन झालं. उन्हाळ्यातही अंतराअंतराने का होईना पण पाण्याची सोय झाली. नदीपासून पाणी शेतापर्यंत नेण्यासाठी मोटारी आल्या. पाईपलाईन, लिफ्ट, जॅकवेल यासारखी आधुनिक तंत्रज्ञान आले. त्यामुळे पाण्याळचे नियोजन होऊन उन्हाळी पिकांना जीवदान मिळाले.

'तरी ह्या कपातीला घाई करून मालाच्या पट्टीतला ऊस ........... पाजला. आता चांगला रंग धरून होता. ..... भर उन्हात ऊस बघितला तर गारेगार दिसतोय. कुठं एक पान सुकं करपलं नव्हतं.'[२६]

रघू शेतोतील आधुनिकतेचे फायदे सांगतो. भर उन्हातही त्याच्या रानातला ऊस हिरवागार आहे. कारण त्याच्या उसाला लिफ्टचे पाणी मिळाले आहे.

रासायनिक खतांचा अतिवापर :

कमी क्षेत्रातून अधिक उत्पादन मिळविण्याच्या विचारातून रासायनिक खताचा वापर करावा असा एक विचार पुढे आला. हरितक्रांतीमध्ये रासायनिक खतांसाठी विशेष शिफारस करण्यात आली. डॉ. एम. एस. स्वामीनाथन सारखे कृषीशास्त्रज्ञ यात अग्रेसर होते. परंतु या कृषीशास्त्रज्ञांना आता पश्चाताप होतो आहे तसे ते बोलूनही दाखवितात.

रासायनिक खते महागडी असल्यामुळे त्याची किंमत सामान्य शेतकऱ्याच्या आवाक्याबाहेरची आहे. त्यासाठी त्याला कर्ज काढावे लागते. कर्ज काढून पैसे उभे केले तरी घात असताना खत मिळेलच असे नाही. रासायनिक खतांचा तुटवडा, खत विक्रेत्यांकडून शेतकऱ्याची आर्थिक पिळवणूक यासारखे प्रकार एका बाजूला तर रासायनिक खतांच्या अतिवापरामुळे अनेक ठिकाणच्या जमिनी या खतांना प्रतिसाद देत नाहीत.

या रासायनिक खतांची आग शमविण्यासाठी पिकांना भरपूर पाणी देण्याची प्रथा रुढ झाली.त्यामुळे जमिनी नापीक बनल्या. मीठ फुटीचे प्रमाण वाढले. शेतकऱ्याच्या समस्येत भर पडली.

**सारांश**

दुसऱ्या प्रकरणामध्ये आपण मोहन पाटील यांच्या लघुकादंबऱ्यातील आशयसूत्रांचे वैशिष्ट्य पाहिले आहे. त्यांच्या लघुकादंबऱ्यांची खास अशी वैशिष्ट्ये आहेत. दुसऱ्या प्रकरणात आलेले आशय सूत्रे म्हणजे बदलते ग्रामीण जीवन, ग्रामीण राजकारणाचे बदलते संदर्भ, शेतकऱ्याचे दारिद्र्य आणि शोषण, घट्ट होत जाणारी जातीव्यवस्था, स्त्रीजीवन, ग्रामीण माणसाची अगतिकता, शेतीचे बदलते स्वरुप, शेतीवरील यांत्रिकिकरणातून निर्माण झालेल्या समस्या अशी अनेक आशयसूत्रे विचारात घेत्यानंतर या आशयसूत्रांचे काही विशेष समोर येतात त्याचे विवेचन सार पुढीलप्रमाणे सांगता येईल.

१. मोहन पाटील यांच्या लघुकादंबऱ्यात आशयसूत्रांची विविधता आहे/.

२. लेखक या आशयसूत्रांची निवड वास्तवातून करीत असल्यामुळे आशयसूत्रांना संपन्नता प्राप्त होते. या आशयसूत्रांतून लेखक समकालीन वास्तवाचा अर्थ शोधण्याचा प्रयत्न करतो.

३. आशयसूत्रांचे वैविध्य आणि व्यापक जीवनदर्शनाचा आवाका यामुळे मोहन पाटील यांच्या लघुकादंबरीचे वेगळेपण अधिक ठसठशित होते.

मोहन पाटील यांच्या लघुकादंबरीतील वातावरण, व्यक्तिरेखाचित्रण आणि भाषाशैलीच्यादृष्टीने वेगळेपण या पुढील दोन प्रकरणातून आपण पाहणार आहोत.

**संदर्भ**


१. आनंद यादव, '*ग्रामीण साहित्य*' : स्वरुप आणि समस्या, पुणे, मेहता पब्लिशिंग हाऊस, द्वितीय आवृत्ती, १९८४,पृ. १७४.

२. चंद्रकांत बांदिवडेकर, '*मराठी कादंबरीचा इतिहास*', पुणे, मेहता प्रकाशन, तृतीय आवृत्ती, १९७३, पृ. १२.

३. रा.रं. बोराडे, '*ग्रामीण साहित्य : चळवळ आणि निर्मिती*', औरंगाबाद, साकेत प्रकाशन, प्रथम आवृत्ती, १९९२, प्रस्तावना, पृ. ३.

४. मोहन पाटील, '*कोंडमारा*', '*पाचुंदा*', : पुणे कॉन्टिनेन्टल प्रकाशन प्रथम आवृत्ती, २००२, पृ. ८.

५. मोहन पाटील, '*कोंडमारा*', उ.नि. पृ. ५.

६. मोहन पाटील, '*कोंडमारा*', उ.नि. पृ. ५.

७. मोहन पाटील, '*लिगाड*', उ.नि. पृ. ५९.

८. मोहन पाटील, '*लिगाड*', उ.नि. पृ. ५९-६०.

९. मोहन पाटील, '*ग्रामीण साहित्य आणि संस्कृती*' औरंगाबाद, स्वरुप प्रकाशन, दुसरी आवृत्ती, २००८, पृ. ११७.

१०. मोहन पाटील, '*कोंडमारा*' उ.नि. पृ. १.

११. मोहन पाटील, '*कोंडमारा*' उ.नि. पृ. १.

१२. मोहन पाटील, '*कोंडमारा*' उ.नि. पृ. ९.

१३. मोहन पाटील, '*कोंडमारा*' उ.नि. पृ. २१.

१४. मोहन पाटील, '*कोंडमारा*' उ.नि. पृ. ७.

१५. मोहन पाटील, '*कोंडमारा*' उ.नि. पृ. ८.

१६. रा.रं. बोराडे, '*ग्रामीण साहित्य : चळवळ आणि निर्मिती*', उ.नि.पृ. ३८.

१७. मोहन पाटील, '*कोंडमारा*' उ.नि. पृ. १६.

१८. मोहन पाटील, '*कोंडमारा*' उ.नि. पृ. १३.


BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

१९. मोहन पाटील, '*लिगाड*' उ.नि. पृ. ६९.

२०. मोहन पाटील, '*खांदेपालट*' उ.नि.पृ. १२९.

२१. मोहन पाटील, '*ग्रामीण साहित्य आणि संस्कृती*' उ.नि.पृ. ९४.

२२. मोहन पाटील, '*लिगाड*' उ.नि. पृ. ५५.

२३. मोहन पाटील, '*लिगाड*' उ.नि. पृ. ५८.

२४. मोहन पाटील, '*कोंडमारा*' उ.नि. पृ. २४.

२५. मोहन पाटील, '*कोंडमारा*' उ.नि. पृ. १०.

२६. मोहन पाटील, '*लिगाड*' उ.नि. पृ. ५५.